९६८५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
अ. नं. ६८८५

पुस्तक आठवें

# सरदार
# त्रिंबक सूर्याजी प्रभु
# ( चौबळ )
यांचें
# ऐतिहासिक अल्प चरित्र

[ चौळच्या माहितीसह ]

—: लेखक :—

बाळकृष्ण सखाराम कुलकर्णी
हमझ टेरेस, गोखले रोड, दादर,
मुंबई नं. १४

RFFBK-0006628

१९४५

किंमत एक रुपाया

पुस्तक आठवें

# सरदार
# त्रिंबक सूर्याजी प्रभु
## ( चौबळ )

यांचें

## ऐतिहासिक अल्प चरित्र

[ चौळच्या माहितीसह ]

REFBK-0006628

बाळकृष्ण सखाराम कुलकर्णी
इसझू टेरेस, गोखले रोड, दादर.
मुंबई नं. १४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६२८
वा. क्र. ६८०६

१९४५

किंमत एक रुपाया

मुद्रकः—डी. एम्. जोगळ,
अशोक प्रिंटिंग प्रेस,
५७० शनवार, पुणें २.

प्रकाशक—डी. एम्. जोगळ,
फॉर जोगळ अँड सन्स,
५७० शनवार पेठ, पुणें २.

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति-बेळगांव

ही समिति स्थापन होऊन सुमारें दीड वर्ष होत आलें. या समितीचे पहिले दोन ग्रंथ "नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या?" व "तोतयाचें बंड" (श्री. पां.गो.रानडे कृत) हे ता. ३१-८-१९४४ रोजीं प्रसिद्ध झाले. त्यानंतर कै. श्रीमंत राघोबादादा पेशवे ऊर्फ राघोभरारी यांच्या, बेळगांवीं पहिल्यानेंच साजरी केलेल्या, पुण्यतिथीच्या दिवशीं म्हणजे ता. २१-१२-१९४५ रोजीं आणखी कांहीं ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध करण्याची कामगिरी या समितीनें आपले शिरावर घेतली व निरनिराळ्या इतिहासतज्ञ लेखकांकडून खालील पांच पुस्तकें लिहवून घेण्यांत आलीं तीं:-

१ **राघोभरारी यांचें चरित्र** लेखक श्री. स. रं. सुठणकर बी.ए.एल.एल.बी.

२ **सदाशिवराव भाऊ पेशवे यांचे चरित्र**, लेखक-श्री. वि. म. भुस्कुटे.

३ **सखाराम हरी गुप्ते यांचें चरित्र**—लेखक य. रा. गुप्ते, बी. ए. एम्. आर. ए. एस्. ( लंडन ).

४ **त्र्यंबक सूर्याजी यांचें चरित्र**—लेखक बा. स. कुलकर्णी.

५ **जुळे तोतये** ( म्हणजे सदाशिवरावभाऊ पेशवे व जनकोजी शिंदे यांना पेशवे दरबारनें ते खरे असतां तोतये कसे ठरविले हा इतिहास ) लेखक-वि. स. वाकसकर.

सध्यांच्या परिस्थितींत असे ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध करणें अत्यंत अवघड होतें. परंतु या समितीला बेळगांवच्या दानशूर श्रीमंत रंगुबाई साहेब जाधव ( केसर-इ-हिंद ) यांनीं पांच हजार रुपयांची उदार देणगी दिल्यामुळें या समितीस या ग्रंथांच्या प्रकाशनाचे काम सुलभ झालें. त्या बद्दल ही समिति त्यांची अत्यंत आभारी आहे.

त्याचप्रमाणें सदर ग्रंथांच्या लेखकांनीं, मुद्रकांनीं व प्रकाशकांनीं या बाबतींत समितीस जें सहाय्य केलें त्याबद्दल ही समिति त्यांची आभारी आहे.

या वरील पांच पुस्तकांच्या आधारासंबंधीं अगर त्यांतील मतें व अनुमानें या संबंधीं आणि त्या पुस्तकांच्या पुरस्कर्त्यांच्या मतांसंबंधीं ते ते लेखक व ते ते पुरस्कर्ते सर्वस्वी जबाबदार आहेत. ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति बेळगांव हिचेवर लेखकांच्या मतमतांतरांसंबंधीं कोणतीच जबाबदारी नाहीं.

| | | |
|---|---|---|
| बेळगांव | } | चिटणीस |
| ता. १५-१२-१९४५ | | ऐ. ग्रं. प्र. समिति बेळगांव |

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति बेळगांव हिनें प्रसिद्ध केलेले ग्रंथ.

| ग्रंथाचें नांव | लेखक | किंमत रु. आ. पै. |
|---|---|---|
| १. नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या ? भाग २ | श्री. पां. गो. रानडे | १४-०-० |
| २. तोतयाचें बंड | श्री. पां. गो. रानडे | १-४-० |
| ३. राघो भरारी यांचें चरित्र | श्री. स. र. सुंठणकर बी. ए. एल. एल. बी. | ३-०-० |
| ४. सदाशिव भाऊ पेशवे यांचें चरित्र | श्री. वि. म. भुस्कुटे | ४-०-० |
| ५. सखाराम हरी गुप्ते यांचें चरित्र | श्री. य. रा. गुप्ते, बी. ए. एम्. आर. ए. एस्. (लंडन) | ३-०-० |
| ६. त्र्यंबक सूर्याजी प्रभू यांचें चरित्र | श्री. बा. स. कुलकर्णी | १-०-० |
| ७. जुळे तोतये | श्री. वि. स. वाकसकर | ४-०-० |

मिळण्याचा पत्ताः—

चिटणीस,

ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति

१२२७ कोनवाळ गल्ली बेळगांव.

अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.

श्री

# निवेदन

सतराव्या व आठराव्या शतकांत अनेक वीर मुत्सद्दी निर्माण झाले. त्यांनीं स्वराज्याकरितां व स्वधर्मासाठीं आजन्म सेवा केली स्वार्थत्याग केला व प्रसंगीं आत्मबलिदान केलें. अशा वीरपुरुषांचीं, देशभक्तांचीं व राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध करून तीं जनतेपुढें ठेवावीं, तेणें करून महाराष्ट्राचा इतिहास सर्वांग सुशोभित करण्यास साह्य करावें, असा फार वर्षांपूर्वीं आम्हीं संकल्प करून या इच्छित्र कार्यास प्रारंभ केला. पण अशा वीरांची साधनभूत ऐतिहासिक माहिती मिळणें दुर्घट झालें. ती अति प्रयासाअंतींहि जशी मिळावी तशी मिळाली नाहीं; व मिळणें शक्यहि नाहीं. याचीं अनेक कारणें आहेत; कित्येकांस आपल्या संग्रहीं असलेली माहिती पाहण्यास सवडच होत नाहीं; तर कित्येकांच्या भाऊबंदी आड येते. कित्येकांच्या संग्रहीं असलेली माहिती त्यांचीं दप्तरें उंदरांच्या अगर कसरीच्या भक्षस्थानीं पडल्यामुळें वाया गेलीं. तीं जर वेळींच पाहिलीं गेलीं असतीं अगर प्रसिद्ध केलीं गेलीं असतीं तर त्यांची महाराष्ट्राच्या इतिहासांत भर पडली असती. पण त्यांनीं आपल्या प्रतापी पूर्वजांचें, त्याजबरोबर आपल्या घराण्याचें वैभव नष्ट केल्याचें श्रेय घेतलें. यापेक्षां ज्यास्त काय म्हणावें! असो! झालें तें गेलें. पण आम्हीं आमच्या सूज्ञ बांधवांस इतकीच नम्र विनंति करितों कीं, ज्यांच्या संग्रहीं ऐतिहासिक माहिती पत्रें वगैरे आहेत तीं त्यांनीं वेळींच प्रसिद्ध करावीं!! असो!

आम्हांस कांही सद्गृहस्थांनीं उदार अंतःकरणानें ऐतिहासिक माहिती पत्रें वगैरे दिलीं, त्यांची आम्हीं सात पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांत तीन चरित्रें:– ( १ ) "मावळा-सरदार-विश्वासराव नानाजी देशपांडे".

( २ ) " वीर-रत्न बाजी प्रभु देशपांडे " आणि ( ३ ) " सरदार-मुरार बाजी देशपांडे " हीं असून तीं लोकप्रिय झालीं. शिवाय तीं मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शिक्षणखात्यांनीं शाळेंतील मुलांस बक्षिसांकरितां व वाचनालयांकरितां मंजूर केलीं. याबद्दल सदरहू शिक्षणखात्यांचे अधिकाऱ्यांचे आम्हीं आभारी आहोंत. जीं चरित्रें आणखी लिहून ठेविली आहेत, त्यापैकीं एक हें चौथें चरित्र " सरदार त्रिंबक सूर्याजी प्रभु चौबळ परळीकर " यांचें बेळगांव येथील ऐतिहासिक समिति प्रसिद्ध करीत आहे. हेंहि लोकप्रिय होईल अशी आशा आहे.

चरित्र नायकांचे वंशज सांप्रत, चौबळ, चावक, परळीकर, मोकाशी, इनामदार कुळकर्णी वगैरे निरनिराळीं आडनांवें लावितात; म्हणून त्यांचे वंशज कोण आहेत हें सहज समजण्यांत येत नाहीं.

चरित्र नायकाचें मूळस्थान व प्राचीन वैभव यांची सविस्तर माहिती आम्हीं चरित्रांत दिली असल्यामुळें, येथें त्याची पुनरावृत्ति करीत नाहीं. डॉ. दिघे यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिली आहे. त्यांत मार्मिक वर्णन केलें आहेच. वाचकांनीं अवश्य वाचावें. चरित्राच्या शेवटीं वंशावळ दिली आहे. त्यावरून चौबळ घराणें कोंकणांत किती प्राचीन आहे हें वाचकांस कळेलच.

प्रस्तुत चरित्र लिहिण्यास ज्या ग्रंथांचे आधार घेतले आहेत, त्यांची यादी सोबत दिली आहे. त्या ग्रंथकर्त्यांचे आम्हीं आभारी आहोंत. तद्वत् श्री. रामचंद्र बाबाजी इनादार ( हल्ली कैलासवासी ) व श्री. मोरेश्वर रामचंद्र इनामदार, या पितापुत्रांनीं आपल्या संग्रहीं असलेलीं सनदापत्रें व कांहीं पत्रांच्या नकला व वंशवृक्ष दिल्याबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानतों.

याहिपेक्षां आमचे विद्वानमित्र, इतिहास-संशोधक श्री. यशवंतराव राजाराम गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस ( लंडन ), माजी असि. सुप.

फॉर एपिग्राफी, यांनीं हें चरित्र प्रकाशित करण्यासाठीं घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे येथें जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. तसेंच डॉ. वि. गो. दिघे, एम. ए., पी. एच. डी., यांनीं विनंतीस मान देऊन, मार्मिक प्रस्तावना लिहिल्याबद्दल त्यांचेहि आम्हीं आभारी आहोंत.

तद्वत् बेळगांव येथील ऐतिहासिक समितीनें हें चरित्र छापवून प्रसिद्ध करविलें त्याबद्दल सदरहू संस्थेच्या चालकांचे आभार मानणें योग्य आहे.

असो ! मागील चरित्रें आमच्या जातभाईचींच म्हणून प्रसिद्ध केलीं नसून ते राष्ट्राला ललामभूत राष्ट्रीय पुरुष होते म्हणून केलीं. हेंहि चरित्र त्याच मुद्यास अनुसरून आहे. वाचकांनीं त्या दृष्टीनें तें पहावें. त्यांत वाद असला तरी तो अठराव्या शतकांतील आहे. विसाव्या शतकांतील नाहीं. इतकें सांगून हें निवेदन संपवितों.

श्री. डी. एम्. जोगल यांनीं वक्तशीर काम केलें, यास्तव त्यांचे आभार मानणें उचित होय.

दादर
ता. १६ डिसेंबर १९४५ } बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी

# प्रस्तावना

[ लेखक– डॉ. विश्वनाथ गोविंद दिघे, एम्. ए., पी एच्. डी. ]

या चरित्राचे लेखक श्री बालकृष्ण सखाराम कुलकर्णी यांची ओळख अभ्यासकांस यापूर्वीच झालेली आहे. त्यांनीं बाजी प्रभु देशपांडे, मुरार बाजी प्रभु देशपांडे, व विश्वासराव नानाजी दिघे या प्रभु वीरांचीं छोटीं चरित्रें लिहून काढलीं आणि त्या निमित्तानें कित्येक शिवकालीन कागदपत्र उजेडांत आणले. या पेक्षां त्यांची भरीव कामगिरी म्हणजे त्यांनीं प्रसिद्ध केलेले चिटणीस घराण्यांचे ऐतिहासिक कागद. चिटणीस छत्रपतींच्या परिसरांतील. त्यांच्या संग्रहाचें महत्त्व कोणाचेहि ध्यानांत येईल. या कागदपत्रांचा परिचय अभ्यासकांस श्री. कुलकर्णी यांचे परिश्रमानें आणि चिकाटीनें झाला आहे.

प्रस्तुत्र पुस्तकांत चौलच्या चौबळ घराण्याची ओळख करून देऊन त्यांतील त्रिंबक सूर्याजी या पुरुषाची पेशवाईतील ऐतिहासिक कामगिरी सविस्तर वर्णिली आहे. बहामनी राज्यसंस्थापनेच्या पूर्वीपासून कायस्थ-प्रभूंची वसाहत कोकणांत झाली असून लेखणीच्या कसबावर ह्यांनीं गांवकुल-कर्ण, देशपांडे देशाधिकारीपणाचीं वतनें मिळविलीं. बहामनी कारकीर्दीत कायस्थांनीं काय कामगिरी बजावली याचे उल्लेख अगदीं त्रोटक आहेत. अधिक विश्वसनीय पुराव्याच्या अभावीं त्यासंबंधीं ज्यास्त लिहितां येत नाहीं. शिवछत्रपतींनीं या ज्ञातीच्या गुणांचा राष्ट्रकार्याकडे भरपूर उपयोग करून घेतला. महाराजांनीं १६५८ त कोकणांत स्वारी केली, कल्याणवरून महाराजांचें सैन्य चौलच्या बाजूस वळलें, तेव्हां मल्हार नारायण चौबळ

स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत सामील झाला. महाराजांनींही त्याची हुशारी पाहून शिद्दी, पोर्तुगीज यांच्यांशीं बोलणीं चालणीं करण्याकरतां त्याची योजना केली. पुढें शामलास शह देण्यासाठीं जंजिरा किल्यानजीक असलेल्या कांसा बेटांवर तटबंदी उभारण्याच्या कामावर मल्हार नारायणाची योजना झाली. तें काम या चौलकरानें उत्तम तऱ्हेनें बजावून महाराजांची मर्जी संपादन केली. त्यांनीं त्यास या नवीन किल्याची हवालदारी सांगून शिद्दीच्या हालचालीवर नजर ठेवण्यास बजाविलें.

महाराजांच्या निधनानंतर मराठी राज्यावर मोठें संकट आलें आणि त्या संकटाची छाया या घराण्यावर पडली. कांसा किल्ला शिद्दीनें काबीज करून मल्हार नारायण व त्यांचें कुटुंब यांना कैदेंत ठेवलें. अठरा हजार रुपये भरून मल्हार नारायणानें आपली सुटका करून घेतली व तो परत चौलास रहावयास गेला. तेथें सुद्धां त्यास स्वस्थता लाभली नाहीं. चौलच्या फिरंग्यानीं त्यास सतावून सोडलें. एका भंडारी कुटुंबाच्या साह्यानें मल्हार नारायण फिरून एकदां शत्रूच्या तावडींतून मुक्त झाला.

मल्हार नारायणानंतर या कुटुंबांत कर्तृत्ववान् पुरुष झाला तो म्हणजे त्याचा पुतण्या त्रिंबक सूर्याजी. त्रिंबक सूर्याजीची पूर्व हकीकत उपलब्ध नाहीं. नाशीक जिल्ह्यांतील त्रिंबक किल्ला घेण्यांत त्यानें जें चातुर्य दाखविलें, धाडस लढविलें त्यामुळें तो पेशव्यांचे नजरेस आला. इ. स. १७४८ त असफजाह निजाम उल्मुल्क मृत्यु पावला. त्याच्या मुलांत वारस हक्काबद्दल भांडणें सुरू झालीं. या गृहकलहाचा फायदा घेऊन निजामाकडे अद्याप जो मराठवाड्याचा भाग राहिला होता तो मुक्त करण्याचें पेशव्यानें ठरविलें. खानदेश, बागलाण कडील बराच भाग निजामकडे असून त्यांत त्रिंबक हें महत्वाचें ठाणें होतें. मैदानी लढाया खेळणें पेशव्याच्या घोडदळास सोपें होतें. पण जंगी तोफखान्याच्या अभावीं तटबंदीच्या जागा घेणें अवघड होई, मग डोंगरी किल्ले काबीज करणें दूरच राहिलें. अशा ठिकाणीं कारवाई चालवून किल्ला सर

करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. त्रिंबक सूर्याजीनें आंतील कांहीं लोकांशीं संधान बांधून, रात्रीच्या अंधारांत, किल्यावर अचानक हल्ला चढविला. एकाएकीं हल्ला झाल्यामुळें किल्यांत एकच गोंधळ उडाला. शत्रुसैन्य कोठून येत आहे, किती आहे याचा कांहींच अंदाज नसल्यामुळें निजामाचे लोक घाबरून गेले आणि त्यांनीं किल्ला शत्रूच्या स्वाधीन केला.

त्रिंबक हें शंकराचें पवित्र स्थान असून कोकणांत, गुजराथेंत आणि खानदेशांत उतरण्याचे मार्ग त्याच्या जवळून गेले आहेत. नाक्याच्या ठिकाणीं असलेला हा किल्ला सर झाला तेव्हां त्यास जातीनिशीं भेट देऊन नानासाहेब पेशव्यानें त्रिंबक सूर्याजीचा मोठा गौरव केला. किल्यावर त्रिंबक सूर्याजीची हवालदार म्हणून नेमणूक करण्यांत आली व त्यास खाजगी खर्चाकरतां कोकणांतील कल्याण नजीकचा परळी हा गांव इनाम म्हणून बहाल करण्यांत आला.

त्रिंबक सूर्याजी हा मोठा चळवळ्या गृहस्थ असला पाहिजे. नुसत्या हवालदारीवर त्याचें समाधान होईना. नजीकच्या जव्हार संस्थानांत पाय पसरण्यास त्यानें सुरवात केली. मोहनकुंवरराणीस साह्य करण्याचे निमित्तानें जव्हारचे वाघेरा व वाशेला हे परगणे त्यानें पेशव्यास मिळवून दिले. पुढें १७५९ त मझफ्फरखानानें सबंध जव्हार व्यापलें, तेव्हां मुलकी कारभार पाहण्यास त्रिंबक सूर्याजीची कमावीसदार म्हणून या भागांत नेमणूक करण्यांत आली, ही कमाविसी त्रिंबक सूर्याजीस फार दिवस लाभली नाहीं. जव्हारकरांशी लवकरच तह होऊन तें संस्थान राजांकडे परत करण्यांत आलें.

त्रिंबक सूर्याजीचा अधिकार त्रिंबक किल्यावर चाले. जवळच पेशव्यांचे चुलते राघोबादादा यांनीं आनंदवल्ली येथें वाडा बांधून वास्तव्य केलें, त्या मुळें साहजीकच या प्रभु सरदाराचा दादासाहेबांशीं घनिष्ठ संबंध आला. दादासाहेबानीं त्रिंबक सूर्याजीस पालखीचा मान देऊन त्यास डभई महालची कमाविसी सांगितली, १७७० त तो सोंधा बिदनूरच्या स्वारींत असल्याचे उल्लेख आहेत.

राघोबादादांची मैत्री या प्रभुसरदाराच्या नाशास कारणीभूत झाली.

दादांचे व बारभाईचें युद्ध जुंपलें तेव्हां दादांच्या स्नेहांतील सर्व मंडळीकडे बारभाई संशयाच्या नजरेनें पाहूं लागले. आधींच सोंध्याच्या स्वारींत झालेल्या कर्जामुळें त्रिंबक सूर्याजी अगदीं जिकीरीस आला होता. आतां तर त्याचा दरबारचा आश्रयही तुटला. कर्जदार सावकारांनीं त्यास अगदीं सतावून सोडलें.

पण एवढ्यानें त्याची संकटपरंपरा संपली नाहीं. त्याच्यावर व समस्त कायस्थप्रभु ज्ञातीवर मोठा मानहानीचा प्रसंग गुदरला.पुण्यांत ब्राह्मण व कायस्थ यांच्यांत कित्येक वर्षे मोठी चुरस लागून राहिली होती. पेशवे दरबाराकडून यावेळीं ब्राह्मण ज्ञातीनें हुकुम मिळविला कीं कायस्थ शूद्र आहेत व त्यांनीं आपले धार्मिक विधी शूद्राप्रमाणें करावेत, वेदोक्त कर्मे करूं नयेत. ग्रामण्य प्रकरणाची चर्चा करण्यास वेळ नाहीं आणि येथें जागाहि नाहीं. फक्त त्याची ऐतिहासिक भूमिका स्पष्ट करतों.

पेशवाईत कायस्थप्रभु आणि ब्राह्मण यांच्यांत धंद्यानिमित्त स्पर्धा सुरू झाली. लेखन हा कायस्थांचा पिढीजाद धंदा. गांवकीचें कुलकर्णपण, महालाची देशपांडेगिरी, किल्याचें गडकरीपण, हीं वतनें कायस्थ कुटुंबें कित्येक शतकें अनुभवीत आलीं. छत्रपतींचा उदय झाला, स्वराज्याचें राजकारण मराठें खेळूं लागले. तेव्हां साहजिकच कारभारांत या कायस्थ लेखणी बहाद्दारांचें वजन वाढलें. चिटणीसांच्या विनंतीवरून राज्यांतील सर्व तपें परगणें, महाल येथें चिटणीस नेमण्याचा हक्क चिटणीस घराण्यास छत्रपतींनीं बहाल केला. शिवाजीनंतर मराठशाही राजकारणांत छत्रपतींची सत्ता सपुष्टांत येऊन ब्राह्मण पेशव्यांचें महत्व वाढलें. छत्रपतींच्या काळांत कायस्थ प्रभूंना जें मानाचें स्थान प्राप्त झालें होतें तें राजाश्रयाभावीं पुढें टिकलें नाहीं. दरबारच्या फडांत आणि महाल परगण्याच्या दप्तरांत पेशव्यांच्या आधारावर ब्राह्मणवर्गाचा भरणा होत चालला. या क्षेत्रांतील पिढीजाद कायस्थ लेखकांचें अस्तित्व या नव्या कारकून वर्गास दुःसह वाटूं लागलें. कायस्थांची उचलबांगडी करून त्यांना हाणून पाडण्याचे प्रयत्न सुरूं झाले. यांतूनच ग्रामण्य प्रकरणास सुरवात झाली असली पाहिजे; कारण कायस्थांनीं ब्राह्मणांचे पौरोहित्याचे अधिकार कधीं मागितले नाहींत किंवा स्वतःची गणना ब्राह्मणवर्गात व्हावी म्हणून कधीं प्रयत्न केला नाहीं. आपणांस क्षत्रिय समजून ते आपले धार्मिक विधी वैदिक पद्धतीनें आचरीत.

कायस्थ प्रभूंनीं आपले धार्मिक विधी, सामाजिक आचार, वैदिक पद्धतीनें चालविले, पुराणोक्त पद्धतीनें कर्में केलीं नाहींत हा कांहीं सामाजिक किंवा वैयक्तिक गुन्हा होऊं शकत नाहीं. शतकानुशतकें चालत आलेली सामाजिक रूढि सोडण्याची त्यांची तयारी नव्हती आणि तशी त्यांना आज्ञा देण्याचा राज्यकर्त्यांना अधिकारही पोहोंचत नव्हता.

प्रभूंनीं वेदोक्त कर्में वेदोक्त आचार पेशवाईत सुरू केले नाहींत, पेशवाई पूर्वी ते कित्येक शतकें आपले धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें करीत आले. कायस्थ प्रभु ज्ञाति केव्हां जन्मास आली, कशी बनली गेली ( Origin ) या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर अद्याप समाजशास्त्रानें द्यावयाचें आहे. चित्रगुप्त व चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रिय आहेत असा गागाभट्टाचा निर्णय आहे. एक गोष्ट निश्चित कीं सोळाव्या सतराव्या शतकांत, सामाजिक श्रेणीमध्यें या ज्ञातीनें वरचा दर्जा पटकावला होता. डॉ घुर्ये, श्री. नानासाहेब चापेकर या समाजशास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे कीं हिंदुसमाज हा कधींही एकाद्या वठलेल्या वृक्षाप्रमाणें निश्चेष्ट राहिला नाहीं. त्याच्यांत सारखी आंदोलनें सुरू होतीं व आहेत. कांहीं जाती आपल्या अंगच्या गुणांनीं, उद्योगानें वर चढल्या, कांहीं प्रतिकूल परिस्थितीनें हीन दशेस पोहोंचल्या. वरचा दर्जा प्राप्त झालेल्या जातींनीं श्रेष्ठ आचार सुरू केले आणि त्याला त्यावेळच्या समाजानें मान्यता दिली. प्रभूंचा पिढिजाद धंदा लेखनाचा असल्यामुळें त्यांचा राजकारणाशीं संबंध हरघडी येई आणि यामुळें ज्या काळांत जाती बनत चालल्या, म्हणजे सुमारें इ. स. ८०० शेंपासून ते पेशवाईपर्यंत, त्यांनीं इतकी आश्चर्यकारक प्रगति केली कीं त्यांच्या क्षत्रियत्वाविषयीं समाजाला शंका उरली नाहीं. एक तर ते जन्मतः क्षत्रिय असले पाहिजेत किंवा हजार वर्षांत प्रगती करून ते क्षत्रियांच्या उच्च दर्जाला येऊन पोहोंचले असले पाहिजेत. जातीचा दर्जा अढळ असतो, तो कमी जास्त होत नाहीं, या खुळचट कल्पनेला समाजशास्त्रानें कायमची मूठमाती दिली आहे. ग्रामण्यप्रकरणाच्या वादांत दोन्ही पक्षांनीं कोणत्या धर्मग्रंथांचे आधार घेतले या प्रश्नाचें कारणच उद्भवत नाहीं. कोणत्याही स्मृतीचा अधिकार अबाधित नसतो. समाजाची परिस्थिति बदलली कीं नव्या युगमानास अनुरूप नवी स्मृति लिहिली जाते किंवा लिहिली पाहिजे. मनु किंवा

नारदाच्या वचनाच्या आधारानें आजची समाजरचना झाली पाहिजे असा आग्रह धरणाराची गणना वेडयांत होईल.

सांगावयाचें तात्पर्य हेंच कीं पेशवाईकालापर्यंत कायस्थ प्रभूंचा दर्जा इतका उच्च स्थितीला जाऊन पोहोंचला होता कीं ते आपले धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें सर्रास करीत होते. त्यांना हिणवण्याकरतां त्यांच्या क्षेत्रांत नव्यानें पाऊल घालणाऱ्या ब्राह्मणवर्गानें त्यांच्यावर ग्रामण्याचें नवीन हत्यार उपसलें. जोंपर्यंत मराठशाहीचें राजकारण चढाऊ होतें तोंपर्यंत या जातीय वादाकडे राज्यकर्त्यांनीं दुर्लक्ष केलें आणि लक्ष घातलें तेव्हां वृत्ति पक्षातीत ठेवली. पण थोरले बाजीरावाच्या मृत्यूनंतर क्षुद्र वृत्तीची लहान माणसें दरबारांत पुढें सरसावलीं आणि मोठ्या हिरिरीनें हे जातीय वाद खेळविण्यांत येऊं लागले. आज जातिभेद पुसत चालले आहेत, भिन्न जातींमध्यें जेवण विवाहादि व्यवहार सर्रास होत आहेत, अशा परिस्थितींतही एकद्या जातीस हीन लेखलें, तिचा दर्जा कनिष्ठ म्हटला, तर त्या जातींतील लोकांस केवढा राग येतो. मग दोनशें वर्षांपूर्वी सामाजिक उच्चनीच भेदभाव समाजांत जेव्हां पूर्णतया जागृत होते अशा वेळीं आचार विचारांत पुढारलेल्या प्रभु समाजास शूद्र पदवीला पोहोंचविण्याचें कारस्थान रचण्यांत आलें तेव्हां या समाजास केवढें दुःख झालें असेल ! ! मुसलमानी राजवटींत मुसलमान अधिकाऱ्यांपुढें हिंदूंनीं घोडयावर वा पालखींत बसून जाऊं नये असे हुकुम काढले तेव्हां हिंदूंवर जुलुम झाला अशी आम्हीं ओरड करितों. कायस्थप्रभूंवर याहून घोर प्रकारचा जुलूम करणारे ब्राह्मण हिंदूच होते, मुसलमान नव्हते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पेशवाईबद्दल प्रभूंना आपुलकीची भावना उरली नाहीं हा त्यांचा दोष नाहीं. राज्यकर्त्यांनींच त्यांना समाजांतून उठविलें.

आणि समाजांतील इतर वर्गांची तरी मनोधारणा उत्तर पेशवाईंत काय होती ? पेशवाईला 'ब्राह्मणी दौलतीचें' स्वरूप प्राप्त झालें. राष्ट्रीय संपत्ति सर्व वर्गांत न खेळतां तिचा ओघ एका विशिष्ट वर्गाच्या दिशेनें वाहूं लागला. काळे, लागू, भावे, रास्ते, पटवर्धन, पुरंधरे या सरदारांना मोठाल्या जहागिरी बहाल करण्यांत आल्या. देवस्थानें व त्यांचे ब्राह्मण

पुजारी यांच्यावर इनामाची खैरात सुरू झाली. पेशव्यांचें कुशल चिंतणाऱ्या ब्राह्मण भिक्षुकांचा योगक्षेम नीट चालावा म्हणून हजारोंवर खाजगी इनामें वाटण्यांत आलीं. सर्व समाजाच्या योगक्षेमाची राज्यकर्त्यांनीं दखलच घेतली नाहीं. यामुळें साहजिकच बहुजन समाजाची पेशवाईवरील निष्ठा उडाली. औरंगजेब बादशाह दक्षिणेंत चालून आला तेव्हां त्याला प्रतिकार करावयास सर्व राष्ट्र तयार झालें. पण आर्थर वेल्स्ली १८०३ मध्यें पुण्यावर चालून आला तेव्हां त्याला विरोध करण्यास एक मायेचा पूत पुढें आला नाहीं. याचा अर्थ हाच कीं अठराव्या शतकांतील शेवटच्या पंचवीस वर्षांतील राजकारण अयस्वी झालें. समाजाच्या गरजा आमच्या राजकारणी पुढाऱ्यांनीं ओळखल्या नाहींत. आपल्या जातिहितापुढें त्यांना मराठराष्ट्राचें हित कळलें नाहीं. मुत्सद्याची मोर्लेनें एके ठिकाणीं मोठी अर्थपूर्ण व्याख्या केली. आहे तो म्हणतो "Wise statesmen are those who foresee what time is bringing and endeavour to shape institutions and to mould men's thought and purpose in accordance with the change that is silently surrounding them." या वचनाप्रमाणें वागणारा एक तरी पुढारी पुणें दरबारांत शेवटच्या काळांत दिसतो काय ? अकबर, शिवाजी, थो. शाहू यांची कीर्ति अजून दुमदुमून राहिली आहे, कारण त्यांनीं सर्व वर्गांना, सर्व जातींना समतेनें वागविलें, आपपर भाव केला नाहीं. सामाजिक विषमता ज्या राज्यांत नांदते तेथें शांतता राहावयाची नाहीं. श्री कुलकर्णी यांचा छोटा चरित्र ग्रंथ वाचतांना मनांत जे विचार स्फुरले ते येथें मांडले आहेत. त्यांनीं प्रभु ज्ञातींतील एका पुरुषाची कैफियत सादर केली हें मोठेंच काम केलें आहे. या समाजावर झालेला अन्याय दूर झाला पाहिंजे. त्यांची कैफियत लोकांनीं ऐकून घेतली पाहिजे.

उद्यम विलास<br>
दादर, मुंबई.<br>
१६ डिसेंबर १९४५ } विश्वनाथ गोविंद दिघे

---

श्री

# सरदार त्रिंबक सूर्याजी प्रभु ( चौबळ )

यांचें

# ऐतिहासिक अल्प चरित्र

[ चौलच्या माहितीसह ]

ग्रंथ संग्रहालय
क्र. ६४२८

## जन्मस्थान.

मराठी राज्यांत अथवा पेशवाईत जे कित्येक शूर सरदार आपल्या स्वपराक्रमानें उदयास येऊन गेले, त्यांत त्रिंबक सूर्याजीची गणना होते. अशा स्फूर्तिदायक पुरुषाचें चरित्र हाच प्रस्तुत लेखाचा मुख्य विषय आहे. महाराष्ट्रांत अनेक घराणीं पूर्वापार प्रसिद्ध होतीच, त्यांनीं आपल्या ज्ञानानें मुत्सद्देगिरीनें, आपल्या देहाचें सार्थक करून आपल्या घराण्यांचीं नांवें उज्वल करून ठेविलीं आहेत. परंतु त्यापैकीं कित्येकांची ऐतिहासिक माहिती महाराष्ट्राच्या इतिहासांत नमूद केली गेली नाहीं. हा सर्व दोष त्यांच्या पश्चात् त्यांच्या घराण्यांतील पुरुषांनीं आपले संग्रहीं असलेली माहिती अंधारांत ठेऊन दिली यास आहे आणि म्हणून त्या शूर वीरांच्या पराक्रमांचा व गुणांचा अंधार इतिहासांत पडलेला आहे. त्रिंबक सूर्याजीचा जन्म ज्या चौल शहरीं झाला, त्याची ऐतिहासिक माहिती थोडक्यांत येथें देतो.

**चौल** हें शहर फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध होतें. हें कोंकण पट्टींत पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यालगत आहे. तें मुंबई शहराच्या दक्षिणेंस तीस मैलांवर व अलिबागेपासून सहा मैलावर कुलाबा जिल्ह्यांत आहे. या शहराला पूर्वी **चंपावती** असें म्हणत असत व अद्यापहि या शहराला **चौल चंपावती** असेंहि संबोधितात; याचें कारण असें कीं, येथें चंपा या नांवाचा

राजा होऊन गेला. यावरून या शहरास चंपावती हें नांव पडलें असें म्हणतात. दुसरें कारण असें कीं सुवर्ण चंपकांच्या झाडांचें जें याठिकाणीं वैपुल्य आहे त्यावरून त्यास चंपावती असेंहि म्हणतात. कोंकणपट्टींत बलाढ्य व जुनें धनाढ्य आणि व्यापाराच्या भरभराटीचें हें शहर असल्यामुळें विदेशीय पुष्कळ प्रवासी या ठिकाणीं येऊन गेले आहेत. तरी पण प्राचीन हिंदु-राजांच्या कारकिर्दीत यास चंपावती, खिस्ती शकाच्या अकराव्या शतकाचे सुमारास चेऊल ( चौल ) व मोगल बादशहांचे कारकिर्दीत "मामले मूर्तजाबाद" म्हणत. पुढेंहि सरकारी दप्तरीं हेंच नांव दाखल आहे.

या शहराचा प्राचीन इतिहास फारच महत्वाचा व घडामोडीचा आहे. हें शहर मुसलमानी अमलाखालीं जाईपर्यंत, म्हणजे इ. सन १३०० पर्यंत, येथें हिंदु राजे राज्य करीत होते. क्षत्रिय राजा चेऊळ राज्य करीत असतां चंपावती नांवाच्या रजपुतानें त्याचा पराभव केला. रणजित सिंगाचा अंमल इ. स. १०७८ पर्यंत होता. त्यास आवास सिंग ([1]आवास) व शहासिंग ( [2]सासवन ) असे दोन पुत्र होते. पुढें दरणें या नांवांचा राज्यांचा अंमल सुमारें २०२ वर्षें पर्यंत होता. दिल्लीचे बादशहास दरणें मानीतनासे झाले; तेव्हां बादशहानें परसू भोंगला कोळी यास दरणें याजवर पाठविला. भोंगला कोळी यानें दरणें याचा पराभव केला व रजपूत राजा बिंब यांस तेथील अंमल सांगितला. बिंबाचा अंमल या शहरावर १२८३ ते १३५८ पर्यंत होता. पुढें बिंब व भोंगला कोळी यामध्यें मोठी निकराची लढाई झाली. त्यांत बिंबराज्याचा पराभव झाला. पुन्हा भोंगला कोळी याचा अंमल चेऊल प्रांतीं १३५९ ते १३५८ पर्यंत होता. यावेळीं भोंगला कोळी लुटमार करून हिंदूची देवळें भ्रष्ट करूं लागला. तेव्हां बादशहानें. फत्तेखान व त्यानंतर हैदरखान या सरदारांची तिकडे नेममूक केली. याचे कारकीर्दीत फिरंगी कप्तान सोज, याने बादशहाकडून दांड दाखड व मुरुड या तीन

---

१ अलीबाग तालुक्यांत "आवास" व "सासवनें" अशीं दोन गांवें आहेत तीं 'आवास' व 'शहासिंग' ( सासवन ) या नांवावरून पडलीं अशी आख्यायिका आहे.—य. रा. गुप्ते, माजी सब्-रजिस्ट्रार, अलीबाग व असि० सर्व्हे. हिंदु व बौद्ध इमारती पु. व. सं. खातें.

चौलच्या पाखाड्या पावाचे खाडी यापासून कोरलईच्या खाडीपर्यंत बक्षिस मिळविल्या. तेथें त्यानें किल्ला बांधण्यास सुरवात केली. कप्तानसोज व हैदरखान या उभयतांनीं स. १५५८ त पोवार व पहाणें यांजबरोबर लढाई करून त्यांस जिवें मारिलें.

सन ८१० ते १२६० पर्यंत शिलहार वंशी राजांकडे हें शहर होतें. पुढें या शतकाच्या अखेरपर्यंत तें देवगिरीचे यादव यांजकडे गेलें. या शहरावरील यादवाची सत्ता तेराव्या शतकांत अस्तंगत झाल्यानंतर ह्या शहरीं सुलतानीं अंमल सुरु झाला. सन १३१८ त हें शहर दक्षिणी मुसलमानाकडे गेलें. नंतर सन १३३६ पासून पुढें विजयनगरच्या हिंदु राजघराण्यापैकीं अनेगोंदींच्या राज्याची सत्ता येथें सुरु झाली. पण ती फार दिवस टिकली नाहीं. लवकरच मुसलमानांनी तें शहर परत आपल्या ताब्यांत घेतलें. सन १४६९ त महमदशहा बहामणी यानें आपल्या ताब्यांत तें घेतलें. पुढें या शहराच्या प्राप्तीसाठीं, गुजराथकर, अहमदनगरकर व पोर्तुगीज यांजमध्यें तंटे लागले. शेवटीं सन १४९० त निजामशाहीच्या तें ताब्यांत आलें. तरीपण कप्तान सोजनें जे चेऊलचे भाग मिळविले होते, ते त्याजकडेच राहिले. या तीन भागास पोर्तुगीज चिऊल, खालचें चेऊल व तिसरें ज्यास रेवदंडा म्हणतात तें, अशीं नांवें पडलीं.

सन १५०३ मध्यें नगरहून बर्थिमा नांवाचा हिंदु चेऊलच्या सुभ्यावर आला. त्याच्या कारकीर्दींत येथें थोडी शांतता झाली खरी; पण, पोर्तुगीजांस त्याच्या धोरणाची धास्ती वाटू लागली, व थोडक्याच दिवसांत त्यांच्यांत झटापटी होऊं लागल्या. बर्थिमाच्या एकंदर धोरणांवरून मुसलमान लोक आपणास घालवून देणार असें पोर्तुगीजांस वाटूं लागलें. आणि म्हणूनच डॉम लॉवरेन्कोडी आलमेडा हा दहा जहाजांचें आरमार घेऊन चौल येथें आला; व त्यानें मुसलमान लोकांच्या बऱ्याच जहाजांचा नाश केला. नंतर उभयतांत तह ठरला.

तह होऊन थोडें स्थिरस्थावर होतें न होतें तोंच पोर्तुगीजांस पूर्वीच्या बलाढ्य शत्रूशीं टक्कर देण्याची पाळी आली. स. १५९८ त इजिप्तहून बारा जहाजांसह हुसेन नांवाचा इराणी सरदार, आपल्या १५०० लोकांसह

प्रथम दीव येथें आला. त्याला गुजराथेंतील मलिक इयाज नांवाचा दीवचा सुभेदार चाळीस जहाजांनिशीं येऊन मिळाला. ह्या संयुक्त सैन्यापैकीं, प्रथम हुसेन यानें आघाडी मारून चौल येथें लावरेन्को याचे आरमारावर हल्ला केला; पण त्याला पहिल्याच हल्लयांत माघार घ्यावी लागली व त्याच्या एक दोन जहाजांचाहि नाश झाला. तेव्हां तो मलिक इयाज येईपर्यंत झाडीच्या आश्रयास वाट पहात बसला. ठरल्याप्रमाणें मलिक इयाज आला खरा परंतु शत्रूनें त्या उभयतांची गांठ पडूं दिली नाहीं. ह्या झटापटींत पोर्तुगीज सरदाराला जब्बर जखम लागली. व तो मारला गेला. या लढाईत पोर्तुगीजांचें सुमारें ४००० व इजिप्सियनांचे ६०० लोक रेवदंड्याच्या खाडींस बळी पडले.

जरी या लढाईत पोर्तुगीजाचा पराभव झाला तथापि त्यांचा दीव येथील गव्हर्नर यानें मोठ्या धैर्यानें ह्या संयुक्त सैन्यावर चाल करून त्यांचा पाडाव केला व पोर्तुगीजांचा अंमल पूर्ववत् कायम करून अहमदनगरकराशीं पूर्वी केलेला तह कायम आहे असें ठरविलें. तद्वत मलिक इयाज याणेंहि पोर्तुगीजांबरोबर स. १५०९ च्या फेब्रुवारींत तह केला.

तथापि स. १५१० ते १६०० पर्यंत चौल येथें शांतता अशी बिलकूल नव्हती. सबंध शतकभर एकसारख्या चकमकी व लढाया चालल्याच होत्या. कोणतीहि दहा वर्षें स्वस्थता होती असें म्हणतां येत नाहीं. या सर्व चळवळीचा रोंख पोर्तुगीजांच्या राज्यातृष्णेच्या बुडाशीं होता. पोर्तुगीजांचा चौल येथें कायमचा पाय ठरेल तर त्यांजकडून दीव येथील त्यांच्या वसाहतीस वारंवार मदत मिळण्याचा संभव होता आणि तसें होणें म्हणजे उशाशींच सापाचें पिल्लूं बाळगण्यासारखें गुजराथकरांस वाटे; आणि ह्याचमुळें त्यांनीं ह्या शतकांत पोर्तुगीज चौलावर वारंवार हल्ले करून त्यांचें किल्ल्याचें काम चाललें असतां होईल तितका त्यास अडथळा केला. त्यास जर अहमदनगरकर अनुकूल असते तर पोर्तुगीजांस केव्हांच आपलें चंबूगबाळें आटपून जावें लागलें असतें; परंतु त्यांस मोगलाशीं लढाया करण्यांत पोर्तुगीज चौलांत उतरणाऱ्या घोड्यांची आवश्यकता लागे, म्हणून ते फारसे त्याच्याविरुद्ध जात नसत. तथापि ज्या ज्या वेळीं त्यांनीं गुजराथकरांस साह्य केलें त्या त्या वेळीं

पोर्तुगीजांचा पराभवच झाला. ज्यावेळीं ते पोर्तुगीजांस मदत करीत त्यावेळीं गुजराथकर मुसलमान चौलांत लुटालूट करीत. सारांश, अशा दुटप्पी वर्तनाचा अवलंब करून पोर्तुगीजांशीं फारसें विरुद्ध न जातां अहमदनगरकरांनीं सोळाव्या शतकाचे अखेरपर्यंत चौल हें शहर आपल्या ताब्यांत ठेविलें होतें. परंतु स. १६०० त अहमदनगरची शूर राणी चांदबिबी मरण पावल्यानंतर तें शहर मोंगलांच्या अकबर बादशहाच्या अंमलाखालीं गेलें. त्यानें या शहराचें नांव "मामले मूर्तजाबाद" असें ठेविलें.

सर्व शतकभर सारख्या चकमकी चालू होत्या तरी पोर्तुगीजांनीं हा मुलूख सोडण्याचा केव्हांहि विचार केला नाहीं. उलट स. १५२१ त बुऱ्हाण निजामशहा राजापासून चौल येथें वखार घालण्याची परवानगी मिळविली. व तिच्या संरक्षणार्थ एक लहानसा घरवजा किल्ला बांधण्याचेंहि काम सुरू केलें. वर गुजराथकरांकडून बांधण्यास प्रतिबंध झाला म्हणून दिलें आहे तो हाच प्रसंग ! असो. किल्ल्याचें काम स. १५२४ त पुरें झाल्यानंतर थोडक्यांच वर्षांनीं त्यांनीं एकामागून एक अशीं निरानिराळीं ठिकाणें येथें बांधलीं. तीं (१) क्यॅथ्रल (१५३४) (२) चर्च थेड् ऑफ धी फ्रान्सिसकन्स (१५३४) ( ३ ) चर्च आणि डॉमेनिकन्सचा मठ ( १५४९ ) ४ हौस ऑफ मर्सी ( १५५० ) ५ दक्षिणेकडची ( रेवदंडा ) किल्ल्याची भिंत ( १५७७ ) ६ चर्च, मठ, जेसुईट लोकांचें कॉलेज ( १५८० ) व एक उंच मनोरा-ज्याला सेंट बॉर्बरा टॉवर किंवा सातखणी म्हणतात तो. या प्रमाणें राहण्याच्या ठिकाणांची सर्व बाजूंनीं मजबुती झाल्याबरोबर, त्यांनीं अहमदनगरकरांशीं असलेला दिखाऊ स्नेह सोडून देऊन माऱ्याचें उत्तम ठिकाण जी कोरलई टेंकडी, तिजबद्दल मागणें केलें. या वेळीं हुसेन निझामशहा हा राजा होता. त्यानें ती मागणी मान्य तर केलीच नाहीं. परंतु युरोपांत ज्यानें मर्दुमकी गाजविली होती, व जो स्वतः विजापुरास होणाऱ्या ब्रान्झ धातूच्या तोफा ओतण्यांत पटाईत होता, अशा चुलाबी रुमीखान नांवाच्या आर्मेनियन सरदाराला तिकडे पाठवून कोरलई टेंकडीवर किल्ला बांधण्याचा हुकूम केला. हें कृत्य पोर्तुगीजांस पसंत न पडून त्यांनीं रुमीखान यांस किल्ला बांधण्यास अडथळा केला. व तसें करितांना त्यांनीं गोव्याचें आरमार आपल्या मदतीस बोलाविलें. त्यामुळें किल्ल्याचें काम कांहीं दिवस बंद पडलें.

पण पुढें सन १५९० ते १५९४ पर्यंत बुऱ्हाण गादीवर असतांना त्यानें सैन्य पाठवून कोरलईचा किल्ला बांधण्याविषयीं हुकूम केला. तें काम स. १५९२ त पुरें झालें. त्या मुळे पोर्तुगीजांस पुढें त्रास होऊं लागला. त्यानें पोर्तुगीजांच्या मुलखा पैकीं कांहीं भाग आपल्या ताब्यांत घेऊन तटास भोकेंहि पाडलीं. त्यामुळें सन १५९४ च्या सपटेंबरच्या ४ तारिखेस ऑल्व्हारोडे आब्रॅचेस हा पोर्तुगीज गव्हर्नर आपल्या बरोबर १५०० पोर्तुगोज लोक व कांहीं विश्वासू तद्देशीय लोक घेऊन कोरलई किल्ल्याचे किनाऱ्यावर गेला. त्याच्या सुदैवानें दरवाज्यावरील हत्ती त्याच वेळीं मेलेला असल्यामुळें सहजगत्या आंत शिरून त्यांनीं तो किल्ला आपले ताब्यांत घेतला.

अशा प्रकारच्या राजकीय उलाढालीची चौल व पोर्तुगीज चौल येथील लोकस्थिति, व्यापार, वैभव, या संबंधीं दोन गोष्टी सांगितल्या असतां त्या अप्रासंगिक होणार नाहींत. हल्लीं रेवदंडा बंदरांतून जो किल्ला दृष्टीस पडतो तो पोर्तुगीज चौलचा भाग, ह्या किल्ल्याचे पूर्वेस दीड मैलावर चौल ( चंपावती ) किंवा जिला अलीकडे " मुर्तजाबाद " असें म्हणतात ती राजधानी होती. बर्थिमा म्हणतो, स. १५०८ त ह्या शहराला चांगली तटबंदी होती. तेथील लोक शूर आणि लढवय्ये होते. तरवारी, धनुष्य-बाण आणि तोफखाना हीं त्यांची शस्त्रें होती. बाबीझा नांवाचा मोरिश गृहस्थ येथें होता. तो म्हणतो कीं, स. १५१४ त सुरत आणि गोवा यांचे दरम्यान चौल हेंच एक मोठें शहर होतें; व तेथील व्यापारी फार श्रीमंत होते. स. १५३८ च्या सुमारास चौल हें पूर्व बाजूस फार भरभराटीचें शहर होतें, असें पाश्चात्यांचें म्हणणें आहे. डच प्रवासी जॉन ह्युजेस डी लिन शॉट हा म्हणतो कीं, पुष्कळ गुजराथी आणि खंबायती व्यापारी चौलांत येऊन राहिले होते. ते तांदूळ, कापूस. नीळ व जवाहिर ह्या व्यापारांत निष्णात असत. हिशेबी कामांत तर ते पोर्तुगीजांपेक्षांही जास्त वाकबगार असत. ( १५८३ ) फॉल्के ग्रेव्हिल हा आपल्या ग्रंथांत लिहितो कीं, स. १५९९ त चोल हें मलबार किनाऱ्यावरील पांच राष्ट्रापैकीं एक मोठें राष्ट्र असावें. फ्रान्कोइस पिरार्ड हा फ्रेंच प्रवासी स. १६०१ ते १६०८ पर्यंत इकडे होता; त्याचें असें म्हणणें आहे कीं, चौलचा किल्ला हा पोर्तुगीजांचे किल्ल्यापेक्षां कमी मजबूत होता. परंतु येथें पुष्कळ व्यापार चालत असे. तसेंच येथें कापड व रेशीम

विणण्याचे पुष्कळ माग होते. चिनांतून गोव्याच्या किंवा हिंदुस्थानच्या इतर व्यापारी शहरांत जो रेशमी माल येत असे, त्या पेक्षां हा सुबक आणि तलमदार असे, व लोकांत त्याची फार चहा होत असे. इटालियन प्रवासी पाइट्रोडेलाव्हॅली ह्यानें ह्या शहराचें फार बारकाईनें वर्णन केलें आहे. त्याच्या म्हणण्यांत स. १६२५ च्या सुमारास बंदरांतून चौलाला जाण्यास दोन मार्ग होते. खुष्कीच्या मार्गाला बरींच झाडें होतीं; हा रस्ता समुद्रकिनाऱ्याच्या बाजूनें ( हरेश्वराकडून ) जाई; वाटेनें कोळयांच्या झोंपडया व पोर्तुगीज लोकांच्या बागा लागत. प्रदेश सपाट असल्यामुळें प्रवासाला जाण्यास आनंद होई. हा रस्ता पुढें रामेश्वराच्या बाजूनें चौलाकडे बाजाराच्या रस्याला जाऊन मिळे. दुसरामार्ग खाडींतून होता. भरतीच्या वेळेस होडींतून जाण्यास सांपडे. आणि ओहोटीच्या वेळीं थोडावेळ मनुष्याच्या पाठीवरून जातां येत असे. बाजारांत सर्व तऱ्हेच्या जिनसा मिळत असत. त्याखेरीज साधारण देशी कापड, मसलिन आणि दुसऱ्या भागांतून चौलांत येणारे जिन्नस मिळत. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांतून व्यापारी येथें येत व रहात. ते फार श्रीमंत होते. त्यांची स्वतःचीं जहाजें असत. बहुतेक हिंदु लोक बाजारापासून दूर अंतरावर रहात असत. त्यांचीं पुष्कळ देवळें होतीं. त्या पैकीं एक मुख्य जगदंबेचें देऊळ, दुसरें अमृतेश्वराचें, तिसरें नारायणाचें व आणखी कांहीं देवळें होतीं, परंतु सगळ्यांत अतिशय पूज्य मानलेलें असें रामेश्वराचें देऊळ होतें.

पोर्तुगीज लोकांस, किनाऱ्यावरील इतर बंदराप्रमाणें चौलचा नाश करितां आला नाहीं यामुळें येथचा व्यापार फार भरभराटींत होता. येथील नुसत्या रोजच्या फुलांचे उत्पन्न सुपली भर सोन्याचीं नाणीं ( हीं बहुधा पार्डिओस असावीं ) होत असे. येथचीं गलबतें ह्या देशांत मलबार व गुज-राथ इकडे जात. यांशिवाय बाह्यदेशीं मलाका, मकाऊ, चीन, आर्मझ इकडे लोखंड, धान्य, नीळ, अफू, व सर्व तऱ्हेचें रेशीम व सुती कापड हे जिन्नस नेत. व तांबडा समुद्र, आर्मझचें आखात, तसेंच किनाऱ्यावरील दुसरीं ठिकाणें व कोचीन, मक्का, पोर्तुगाल व चीन येथून कच्चें व तयार केलेलें रेशीम, शेंदरी रंगाचें कापड, व मातीचीं भांडीं हा माल इकडे आणीत. बहुतेक गलबतें मलबार व गुजराथ इकडील असत व त्याकरितां

बंदरांत एक गोदीही बांधिली होती.

तद्वत् पोर्तुगीज चौलचीहि भरभराट कमी होती असें नाहीं. तेथील एका पोर्तुगीज बाईनें स. १५४५ त म्हटलें आहे कीं, गुजराथकराशीं १० वर्षें लढाई चालवितां येईल इतकें जवाहीर येथें आहे. स. १५७७ त पोर्तुगीज चौलची फार भरभराट होती. सर्व ठिकाणांहून या ठिकाणीं गलबतें येत. व्हेनिशियन प्रवासी सीझर फ्रेडरिक हा म्हणतो कीं, स. १५८३ त पोर्तुगीज चौल हें चांगलें तटबंदीचें शहर होतें व तेथून दीड मैलावर मूर शहर होतें. दोन्ही व्यापाराचीं चांगलीं बंदरें होतीं. फ्रानकोईस पिरार्ड हा फ्रेंच प्रवासी स. १६०१ ते १६०८ पर्यंत इकडे होता. त्याच्या म्हणण्यांत पोर्तुगीज लोकांचा चौल हा किल्ला दमण किंवा वसई या किल्ल्यापेक्षां मजबूत होता. कारण हा भाग अतिशय श्रीमंत असून यांत मौल्यवान माल येत असे, आणि हिंदुस्थानच्या बहुतेक भागांतून मोठमोठे व्यापारी विशेषतः मूर्तिपूजक हिंदु येत असत. हवा चांगली आणि राहणी स्वस्त असे. पोर्तुगीज चौलचा किल्ला, चौलच्या किल्ल्यापेक्षां मजबूत होता. स. १७२८ त पोर्तुगीज अम्मलदार ॲन्ड्री रॉबेरीरो कौन्टिनहो यानें किल्ल्याची सरकारीरीत्या तपासणी केली, तेव्हां म्हटलें आहे कीं, उत्तरेकडील प्रदेशांत चौल हा मोठा किल्ला होता. स. १६३४ पर्यंत किल्ल्याच्या तटबंदीची इतकी सुधारणा झाली होती कीं तो बहुधा पुनः बांधला गेला होता. आकारांत त्याला १५ बाजू होत्या व नऊ बुरुज होते. व चार पुढें आणिलेले असे भाग होते. त्याजवर तीनपासून चाळीस पौंडपर्यंत गोळे फेंकणाऱ्या अशा अठ्ठावन तोफा होत्या. मुख्य कमांडर बुरुजांत राहत असे. आंत पोर्तुगीज लोकांची सुमारें दोनशें व देशी ख्रिश्चनचीं पन्नास घरें होतीं. तीं दुमजली चुनेगच्ची असत व त्यांचे नोकर चाकरहि असत. किल्ल्याच्या उत्तरेकडील भिंतीच्या बाहेर श्रीमंत हिंदु लोकांची वस्ती होती. गोवें येथील पोर्तुगीज लोकांच्या कारखान्यांतून व गुजराथेकडून तांबें, पारा आणि व्हर्मिलियन हे पदार्थ इकडे येत. ह्या धातूचा चौल येथें व गुजराथ येथें चांगला उपयोग होत असे.

येथपर्यंत वेळोवेळीं लिहिलेली ह्या दोन ठिकाणांची तत्कालीन स्थिति आणि त्यांची आज दिसून येणारी स्थिति, हीं पाहण्यास जर एखादा वरील प्रवासी असता, तर त्यास हरएक बाबतींत पडलेल्या जमीन अस्मानाच्या

फरकामुळें तो आश्चर्य-चकित आणि उदासीन झाला असता, आतां ही स्थिति प्राप्त होण्यास कोणकोणतीं कारणें घडून आलीं, ती जाणण्याकरितां पुन्हा एकवार आपण ह्या ठिकाणांच्या ऐतिहासिक भागाकडे वळूं.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें स. १६०० त अशा भरभराटीच्या स्थितींत चौल हें जरी अकबराकडे आलें तथापि ते त्याजकडे फार दिवस टिकलें नाहीं. डच लोकांनीं या शहरांत थोडी ढवळाढवळ केलेली जाणून अहमद-नगरचा अबिसीनियन प्रधान मलिकंबर यानें पोर्तुगीजांचे साह्यानें मोंगल व डच यांना तेथून घालवून दिलें. पुढें विजापूरचा बादशहा अदिलशहा ह्यानें स. १६३१ त तें आपल्या ताब्यांत घेऊन लगेच मोंगलांना दिलें. स. १६३१ त मोंगल बादशहा शहाजहान यानें अहमदनगरचें राज्य बुडवून त्या खालील सर्व मुलूख कांहीं शर्तींवर विजापूरकरांकडे दिला. यामुळें हें शहर त्यांजकडे गेलें. तथापि तें त्यांजकडे फार दिवस राहिलें नाहीं. पुढें स. १६४८ त शिवाजी महाराजांनीं कोंकणांत स्वारी केली. मध्यंतरी कांहीं दिवस इकडील कांहीं ठिकाणें घेतां आली नाहींत. तथापि पुढें लौकरच म्हणजे स. १६७२ त त्यांनीं मुसलमानी चौलाचा पाडाव करून तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा उभारिला. उत्तरोत्तर पोर्तुगीज लोकांची सत्ता कमी होऊं लागली. ह्याच संधीस मुंबई येथें इंग्लिशांची वसाहत स्थापन झाल्या-मुळें, व मराठ्यांचाहि या ठिकाणी पुरा जम बसलेला नसल्यामुळें चौल व पोर्तुगीज चौल येथील बहुतेक संपत्ति व व्यापार नष्ट झाला. चौलाकडे वंडाळी सुरू झाल्यामुळें व्यापारीदृष्ट्या मुंबईचा फायदा झाला. येथें जे विणकर होते—जे दरसाल पांच हजारापर्यंत ताफते रेशमी कापड तयार करीत—त्यांनीं मुंबईस यावें म्हणून येथील इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्यांचे मन वळविलें. त्यांच्याकरितां मुंबईस पहिला रस्ता बांधण्यांत आला. अशा रीतीनें येथून जे विणकर, सुतार इ. कामगार मुंबईस जाऊन राहिले ते अद्यापहि आपणांस "चौलकर" म्हणवितात असो.

शिवाजी महाराजांच्यानंतर जंजिऱ्याचे शिद्दीनें चौलची लूट केली. त्याचा पोर्तुगीजांनीं प्रतिकार केला नाहीं. म्हणून संभाजीनें त्यांच्या किल्ल्यास वेढा दिला. परंतु पोर्तुगीजांच्या मजबूत तोफांमुळें त्याला वेढा उठविणें भाग पडलें. ( १६८३ ).

पुढें स. १६९४ त मोंगल लोकांनीं पोर्तुगीजांना रेवदंडा किल्ल्यांतून हांकून दिलें. तेव्हां त्यांनीं चौलचा आश्रय धरिला. परंतु तेथेंहि मराठयांच्या वारंवार हल्लयामुळें सन १७३९ त त्यांस रेवदंडा व कोरलई ह्या किल्ल्याचें रक्षण करितां येईना; त्यामुळें पोर्तुगीज गोव्यास निघून गेले. अशा प्रकारें हा प्रांत पहिल्या बाजीरावानें परस्थांचे हातून सुमारें साडेचारशें वर्षांनीं हिंदूंच्या पूर्ण ताब्यांत घेतला.

## या शहराच्या पूर्वी १६ पारवाड्या होत्या:—

१ पारवाडी प्रथम. २ पारवाडी अंबेपुरी, ३ पारवाडी मोरवाव, ४ पारवाडी इसवी, ५ पारवाडी दांडे, ६ पारवाडी बेळावी, ७ पारवाडी भोरशी, ८ पारवाडी कुडाळ, ९ पारवाडी उसवी, १० पारवाडी दाखवी, ११ पारवाडी पेठ, १२ पारवाडी वैजाली, १३ पारवाडी शिराळी, १४ पारवाडी कोपरी, १५ पारवाडी १६ पारवाडी करबा.

तसेंच या शहराचा प्राचीन इतिहास इतक्या कांहीं भानगडीचा आहे कीं, त्याची सामान्य लोकांस फारच थोडी कल्पना करितां येईल; थोडक्यांत सांगावयाचें तर प्रस्तुतच्या मुंबापुरीची ही वृद्ध माता, आयुष्याचे दिवस कसे तरी कंठीत आहे. असो ! हें शहर मुसलमानी अमलाखालीं जाईपर्यंत म्हणजे सन १३०० पर्यंत या ठिकाणीं हिंदुराजे राज्य करीत. महाभारतांतील अश्वमेध यज्ञावरून या ठिकाणीं पूर्वी हंस ध्वज राजा राज्य करीत होता, असें दिसतें. महाभोज, आंधभृत्य, ह्या राजांचाही येथें निकट संबंध असावा, असेंहि वाटतें. ( श्री देऊसकर कृत " चौल शहराचा इतिहास. ")

या उलाढालीच्या व व्यापारी शहरांत चौबळ घराण्याचें वास्तव्य होतें. अर्थात् अशा ठिकाणीं वास्तव्य करून राहणारे धाडसी व मुत्सद्दी निपजणारच ह्या चौबळ घराण्यांतील प्रत्येक पुरुष धाडसी व राजकारणी निघाला हें खालील माहिती वरून अवगत होईल. हें घराणें या शहरीं किती प्राचीन आहे हें पुढील माहितीवरून कळेल. सरकारांतून प्रसिद्ध झालेला Monograph No. 4 Prabhu caste या पुस्तकांतील उतारा पुढील प्रमाणें आहे:—

अनुक्रम २८९१ विभाग ... क्रांक ... नों. दि.

" From the two inscriptions found at Choul and other places mentioned above it seems that Prabhus had begun to settle in the Konkan when the Silhar Princes were rulers of that country. The history of the Vatans of Deshapandes shows that they were obtained before the kings of the Bahamani Dynasty had established their power in the Deccan. Thus the conclusion is again suggested that the Konkan and Maval were inhabited by the caste progenitors in the tenth and eleventh century, and it may thus be shown that since then, they have remained stationary and formed an important element in the Maratha confederacy. which afterwards embraced those regions" ( p. 7 ).

वरील माहिती वरून हें भरभराटीचें शहर शिलहार राजाकडे होतें असें दिसतें. पण त्या वेळची चौबळ घराण्याची ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. ती बहामनी राज्यापासून पुढें उपलब्ध झालेली आहे ती:– या घराण्याचा मूळ पुरुष नारायण कृष्ण याचें उपनांव, चौबळ, याचें गोत्र भारद्वाज तो राहणार कसबे चौल प्रांत मजकूर मामले मूर्तजाबाद तेथील देशपांडेपण व गांव कुळकर्णी त्याचें. ब्राह्मण टपा व उमटे टपा व मांडळ टपा या तीन महालाची वतनें त्याची. तो श्री चिमणभार्गव याचें तळे ढोल, समुद्राचे उत्तरेस आहे, त्या तळ्याचे पश्चिमेस राहत असे. तेव्हां चौलचा देशमुख यानें तो हिशेबाचे कामांत तबेंज असून कारस्थान चांगलें जाणत होता म्हणून त्यास दौलताबाद येथील पादशहा, महमदशहा त्याचा मुलगा सलतान अहमदशहा ब्राह्मणी याजकडे रसद व नजराणा देऊन पाठविला; शालिवहान शके १३४७ विश्वासुनाम संवत्सरे सु ॥ सन शीत अशरीन समानीन मया सन हिजरी ८४१. इ. १४२५–२६

नारायण कृष्णानें दौलताबादेस जाऊन बादशहास नजराणा देऊन उत्पन्न झाल्यापैकीं खर्च वजा करून बाकी राहिली ती त्यास देऊन तपशील वार हिशेब रुजू केला. त्यामुळें बादशहा फारच खूष झाला. दुर्गादेवीचा दुष्काळ शके १३१८ पासून १२ वर्षपर्यंत पडला होता. "तीस वर्षें

सरकारी वसूल कोठूनहि आला नव्हता. पण तुम्हीं विश्वासू असल्यामुळेंच तुमच्या कडून आला." असें बोलून, नारायण कृष्णाचा गौरव बादशहानें केला. तो देखणा, तरतरीत, समयसूचक असे. त्याचें बोलणें सत्य, अक्षर चांगलें. तो फारसी लिपी जाणणारा असे. त्यामुळें बादशहा खूष होऊन त्याने तेथेंच पालखीची व चेऊलच्या सुभ्याची नेमणूक त्यास करून दिली. त्याचा मुलगा गोविंद नारायण. त्यास सुलतान अहमदशाचा मुलगा अल्लाउदीन ब्राह्मणी यानें, आपला वजीर मिया मनउल्ला कारभारी याच्या मदतीस देउन, कोंकणांत व मावळांत, रामोशी, हिंदु व मराठे लोक तेथील डोंगरी किल्ल्याच्या आश्रयानें बंडें करीत असत, त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां, जुन्नर व चाकण चौऱ्यायशीं वगैरे ठीकाणीं इमारती व चौक्या बांधून, त्या बंडखोरांच्या बंदोबस्त करण्या करितां नेमिला. त्यानें डोंगरांत अचूक अशा नाक्याच्या जागा पाहून ठाणीं दिली, खर्चाची रक्कम वगैरे नक्की करून बादशहास दिली. आणि योग्य बंदोबस्त करून बंडखोरांची बंडें मोडलीं. त्या मुळें बादशहा गोविंद नारायण याजवर फार प्रसन्न झाला. या कामगिरीबद्दल त्याचा त्यानें योग्य सन्मान करून त्यास बक्षिस दिलें.

या गोविंद नारायणाचा मुलगा नारो गोविंद. हा शके १४०० विलंब नाम संवत्सरे सुरू सन तिस्सा सबैन समानीन मया सन हिजरी ८९४ ला दौलताबादेस गेला. बादशहानें त्याची नेमणूक वजीर खात्रेखान याच्या मदतीस केली. त्यावेळीं दौलताबादेखालील मुलूख म्हणजे बहामनी बादशहाच्या ताब्यांतील प्रांत, अहद उत्तर तीर नर्मदा, गंगा, गोदागंगा, मध्यदेश, कर्नाटक व तैलगण आंध्रदेश सुद्धा, चार सुभे. येथील अधिकारी बादशहाचा अधिकार न मानतां स्वतंत्रच कारभार करीत. तथापि नारो गोविंद यानें त्या प्रांताची तपासणी करून प्रत्येक सुभ्याचे दोन दोन भाग केले ते बि तपसील—

| | |
|---|---|
| १ कलबुर्गा मूळ सुभा. | ३ मूळ तैलंगण |
| १ विजापूर | १ राजमंद्री |
| १ हासनाबाद | १ वारंगुल |
| —— | —— |
| २ | २ |

| | |
|---|---|
| २ मूळ दौलताबाद | ४ वराड जुनें |
| १ दौलताबाद | १ गोवळकोंडा |
| १ जुन्नर | १ माहूर |
| ---- | ---- |
| २ | २ |

ठिकठिकाणीं नवीन अधिकारी नेमिले. त्यामुळें थोडक्याच दिवसांत त्या सुभ्यांचा बंदोबस्त चांगला झाला. पुढें नारो गोविंद हा हैदराबाद म्हणजे भागानगर, गोवळकोंडा किल्ला, शालबिंडा, येथें मुत्सद्दीगिरी करून रहात होता. त्याला त्याच्या खाजगीकडे तैलंगण देश वगैरे दिले होते. [ शके १४४६ तारण नामसंवत्सरे शु।। सन खमस असरीन तिसामया हिजरी ९४०] इ. १६२४–२५

याचा मुलगा कृष्णाजी नारायण भागानगरीं राहून निजाम उल्मुलूक बहिरी म्हणजे पाथरी गांवचा कुलकर्णी मूळ दुर्गादेवीचा दुष्काळ पडला त्यावेळीं कर्नाटकांत गेला , त्याजबरोबर होता. तो तिकडेच कित्येक वर्षे राहिला. नंतर गोवळकोंडे येथें आला. तेथें कारभार करून असे.

त्याचा मुलगा गोविंद कृष्ण भागानगरीं हजार स्वारांचा सरदार होता, खेरीज मामलतहि करीत असे. पुढें तो गोवळकोंड्याचे किल्ल्याचा किल्लेदार होता.

त्याचा मुलगा नारो गोविंद भागानगरीं बादशहाच्या रोजगारावर असे. पण तेथें त्यांची बायको व मुलगा (मल्हारी) नेहमींच आजारी असत. दुसरें मूल होत नव्हतें; तेथील तेलंगी मंत्र्यानें गुणावर आणिलें. आपणांस दैवीक बाधा आहे, असें समजून नारो गोविंदाने जेजुरीस खंडोबाचें व तेथून एकविरेचें स्थानीं जाऊन तिचें दर्शन घेतलें. नंतर तो आपल्या बायको मुलासह मूळस्थान चौल ( चंपावती ), येथें शके[1] १५६० ला आला त्यावेळीं चौल येथील तिमाजी व्यंकटेश प्रभु देशमुख होता. त्यास भेटून सर्वांची ओळख पटवून नंतर मूळचें घर मोडून गेलें होतें, त्यानजीक ढोळ समुद्राचे

१ इ. स. १६३८–९ य. रा. गुप्ते.

उत्तरेस तळ्याच्या पाळीवर घर बांधून राहिला. पुढें या कुळांत सूर्योदय म्हणजे दुसरा पुत्र झाला त्याचें नांव सूर्याजी ठेविलें. तिसऱ्या मुलाचें नांव विठ्ठल ठेविलें. इकडे आल्यावर त्यांनीं आपले, ब्राह्मण टपा, उमटा टपा, व मांडळ टपा, या तीन महालाचें कुलकर्णीचें काम चालू केलें. देश कुलकर्ण मागाहून संपादन करण्याचें ठरवून देशमुखीचें कामास आपल्या वडील मुलास नेमून दिला. नंतर वरसोली येथील कुलकर्णी स्थाइक राहणारे यांनीं आपली मुलगी मल्हार नारायण यांस दिली. ह्यावेळीं चौल येथे सुमारें पांचशें चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंची घरें होतीं.[१]

या प्रमाणें चौलास कारकून ठेऊन काम करीत असतां, कल्याणहून श्री. शिवाजी महाराजांकडून स्वार व जासूद खंडणी मागावयास चौलास आले, त्यांनीं चौलच्या पूर्वेस गडग्याचा मारुती म्हणून हल्लीं प्रसिद्ध आहे, त्याचे दक्षिणेंस तळ्यालगत ( दत्ताचे डोंगराच्या पश्चिमपायथ्याशीं ) आपली छावणी टाकून दिली. त्यांस शिधा व जनावरांस चंदी वैरण वगैरे देऊन त्यांचे स्वागत व नंतर तिमाजी व्यंकटेश यांचे वडील व्यंकटराव देशमुख करण्यांत आलें. यांनीं शहरांतील थोर थोर सावकार व भले मनुष्य जमवून शिवाजी कोण ? याचा विचार करून ठरविलें कीं शहाजीराजे जे दौलताबादेस कारभारी होते, ते हल्लीं विजापुरकराकडे चाकरीस आहेत, त्यांचा मुलगा शिवाजी, ज्यानें मराठी राज्य स्थापण्याचा उपक्रम केला आहे तो. असें सर्वांच्या विचारें ठरल्यानंतर मल्हार नारायण सर्वांच्या वतीनें शिवाजी महाराजांकडे जाऊन खंडणी ठरऊन आला. नंतर महाराजांनी तिमाजी व्यंकटेश प्रभु यांस त्या प्रांताचा सुभेदार नेमला. आणि मल्हार नारायण यांस शिबंदी ठेऊन रेवदंड्याचे फिरंगी यांचा बंदोबस्त करण्यास सांगितलें. त्या प्रमाणें मल्हार नारायण यानें शिबंदी ठेविली. त्या प्रांताचा बंदोबस्त करीत असता, फिरंग्यांची मालानी भरून जाणारीं गलबतें त्यानें अडकाविलीं. तेव्हां फिरंगी लढूं लागले त्यांस पण मल्हार नारायण यानें दाद दिली नाहीं. तेव्हां गोवें, रेव-

---

२ या पैकीं बरीच मंडळी काठेवाड बाजूनें मांडलीक गुप्तांचे मुलूखांतून तेथें आलीं असावींत, सर्वच मांडव गडाहून आली नसावींत असें श्री. य. रा. गुप्ते, पु. व. सं. यांचें मत आहे.

दंडा, साष्टी, वसई व दमण या पांच ठिकाणच्या फिरंग्यानी, मल्हार नारायणाच्या मार्फत शिवाजी महाराजांकरितां चौलास तह केला. त्यांत असें ठरले कीं, फिरंग्यानीं महाराजांस दरसाल सोनें खंडी ३ व दारु खंडी २०० गोळे सुमारें २००० व शिसें खंडी १० गोळ्यास व दर ठिकाणीं पांचशें लोक कुमकेस द्यावे. या झालेल्या तहामुळें व त्यानें केलेल्या पराक्रमामुळें महाराज फार खूष झाले. त्यांनीं मल्हार नारायणास विचारलें कीं तुला काय बक्षीस हवें ? तेव्हां त्यानें सांगितलें कीं ब्राह्मण टपा, उमटे टपा व मांडळ टपा या तीन महालांचें गांवकुळकर्ण व देशकुळकर्ण हीं वंश परंपरें चालावींत हेंच मागणें आहे. तेव्हां महाराजांनीं ह्या तीन टप्यांच्या आपल्या नव्या सनदा करून दिल्या. पुढें महाराजांस जंजिरा घेण्याची मोहीम करावयाची होती. त्याजवर मल्हार नारायणाची नेमणूक त्यांनीं केली. जंजिऱ्याच्या हबशास शह देण्याकरितां, जंजिऱ्याच्या किल्ल्यानजीक महाराजांनीं किल्ले बांधण्याचें काम चालू केलें. सावंत आपलेसे करून मालवणचा किल्ला बांधला. तो पाण्यांत असल्यामुळें नांव सिंधुदुर्ग ठेविलें. मोरोपंत पेशवा छावणी ठोकून बसला होता. परंतु यश आलें नाहीं. तसेंच काशावर दोन वेळां किल्ला बांधण्याचा प्रयत्न त्यानें केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां किल्ला बांधण्याचें सर्व साहित्य तयार करा व मी सांगेन तेव्हां किल्ल्याचें काम सुरू करा. त्याप्रमाणें किल्ला बांधण्याचें साहित्य– चिरे, वाळूचे कणगे, शिसें पातळ करून चिरे बसविण्यास उसाच्या रसाच्या कढया, खेरीज दारू गोळा तोफा वगैरे तयार करून गलबतें भरून ठेविलीं. महाराजांकडून हुकूम होतांच एकारात्रींत किल्ला बांधून तयार करून तटबंदी व बुरुज बांधून तोफा ठेविल्या. कासा कोठारामध्यें पाणी खेळतें म्हणोन नांव पद्मदुर्ग ठेविलें. किल्ला बांधलेला पाहून जंजीरकर धाऊन आला., पण त्याचा कांहींच उपयोग न होतां, त्यास माघार घ्यावी लागली. तेथें शांतता झाल्यावर, त्या किल्ल्याच्या बंदोबस्तास बहिरजी नांवाचा मराठा होता. त्यास हवालदार नेमून आपण महाराजांच्या भेटीस मल्हार नारायण रायगडास गेला. महाराजांस किल्ला बांधल्याची हकीकत सांगितल्यावर ते फारच खूष झाले, व वस्त्रालंकार बक्षीस देऊन खर्चाची नेमणूक, चौलास तिमाजी व्यंकटेश याजकडून करविली. आणि जंजिरा घ्या म्हणून हुकूम केला; तुम्ही याच किल्ल्यांत रहात जा, कोणाचाहि

विश्वास धरूं नका. महाराजांनीं असें सांगितलें खर्चाची नेमणूक चौलास करून दिलीच होती. "शिवाय किल्ल्याच्या खर्चास जे लागेल तें कळवित जा, म्हणजे पाठवून देऊं. तुम्हास सरंजाम देणें तो जंजिरा हस्तगत झाल्यावर देऊं. किल्ला सोडून इकडे येऊं नये." याप्रमाणें महाराजांची आज्ञा घेऊन तो चौलास आला. पूर्वीं त्याचे वडिल वारले. नंतर धाकटे बंधू सूर्याजी व विठ्ठल यांची लग्नें केली. नंतर मातोश्री वारली.

मल्हार नारायण पद्मदुर्गांत रहावयास गेल्यावर चौलचा व्यवहार कारकून करीत होतेच; पण त्याचा धाकटा भाऊ विठ्ठल याजवर विश्वास असल्यामुळें चौलच्या सर्व इष्टेष्टीचा व्यवहार त्याजकडे सोंपविला. सूर्याजीचें मात्र भावाबरोबर पटत नव्हतें. म्हणून त्यांजकडे घरगुती व्यवहार नव्हता. मल्हार नारायण पद्मदुर्गास जाऊन राहिले! त्यांस महाराजांचा सक्त हुकूम होता कीं जंजिरा येवो अगर न येवो, पण तुम्हीं बांधिलेला किल्ला मात्र जंजिरकरांच्या ताब्यांत जाऊं नये, तुम्हीं किल्ल्यांतच रहावें. पुढें महाराज दिवंगत झाल्याबर सर्वत्र अंदाधुंदी झाली. मोंगलांनीं बहुतेक प्रांत बळकावला, व किनारा जंजिकरांनें बळकाविला. चौल मोंगलाचे ताब्यांत गेल्यामुळें किल्ल्यांत खर्चाची व धान्याची अडचण पडत चालली. पण तो कच्च्या दिलाचा नव्हता. स्वतःच्या हिमतीनें आरमार चालवून खंडणी घेत असे. आणि रेवदंड्याच्या फिरंग्याकडून सर्व जिनसा घेऊन जात असे. नंतर पुढें पद्मदुर्ग किल्ल्यांत पटकीचा आजार झाला. त्यांत फार माणसें दगावलीं. मल्हार नारायण यानें जंजिरकरांचा वारंवार हल्ला होत असतां निभाव लागणें कठीण आहे, असें जाणून किल्ला जंजिरकरांच्या ताब्यांत जाण्यापेक्षां आंग्र्यांस द्यावा म्हणून त्यांजकडे बोलणें चालू केलें. पण आंग्रे येण्यापूर्वीच जंजिरकरांनें किल्ल्यावर हल्ला केला. त्यावेळीं मल्हार नारायण गलबतें घेऊन लुटीस गेला होता. किल्ल्यांतील बायकांनीं मोठ्या धिटाईनीं उकळतें पाणी व पेज ताटावरून ओतून शत्रूच्या हल्ल्यांस कांहीं वेळ प्रतिबंध केला. पण अखेर शत्रूंचें सैन्य किल्ल्यांत शिरून किल्ला ताब्यांत घेतला मल्हार नारायणाचीं मुलें व बायको यांस धरून त्यास मुरुडास अटकेंत ठेविलीं. मागाहून मल्हार नारायण यांसहि धरून कैद केला. नंतर सिद्दी यानें त्यांस बाटावे किंवा चाकरी करावी असें कळविलें. तेव्हां त्यानें स्पष्ट सांगितलें कीं, आम्हीं दुसऱ्याची आजपर्यंत चाकरी केली नाहीं.

त्यापेक्षां आजच मेलों तर बरें ! तेव्हां सर्वांच्या मध्यस्तीमुळें व स्वतः त्याचा भाऊ सूर्याजी यानेंहि सांगितलें कीं हल्ल्याचे वेळीं तो तेथें नव्हताच, त्यामुळें रु. १८००० खंडणी घेऊन त्यास सोडण्याचें शिद्दीनें ठरविलें. ह्यावेळीं इतकी रक्कम मल्हार नारायण याजवळ नव्हती; पण ती भरीपर्यंत त्याची मुलें व बायको शिद्दीनें ओलींस ठेविली. आणि मल्हारजी नारायण यांस खडणीची व्यवस्था करण्यास मोकळे सोडलें. त्यांस रु. १२००० चौलच्या सावकारांनीं पूर्वींच्या प्रलय काळच्या उपकाराची फेड म्हणून दिले आणि रु. ६००० रेवदंडेकर फिरंगी यांजकडे पूर्वीचें हिशेबाच्या बाकीप्रमाणें दिले. या प्रमाणें रु. १८००० चा भरणा करून आपणांस मुक्त करून घेऊन तो चौलास मुलांमाणसांसुद्धां येऊन राहिला.

वरील संकटांतून मल्हार नारायण यानें आपली सुटका करून घेतली खरी; पण त्यावेळीं तो जरी हतवीर्य झालेला होता, तरी पुढें दोन संकटें त्याजवर ओढविलेलीं होतींच. एक फिरंग्याचें व दुसरें आंगऱ्याचे. पद्मदुर्गाचा क्रिल्ला जजिरकरानें घेतला. आणि हा चौलास राहणार, तर केव्हां तरी आपणांवर संकट आणील, हें मागच्या तहाची आठवण ठेवून त्यास मुलामाणसासह,पकडून उरणास (बोरींत) पाहऱ्यांत (अटकेंत) नेऊन ठेवण्यांत आलें. हा कर्ता पुरुष; तेव्हां यांस बाटविल्यास आपला फायदा होईल असें जाणून त्यास बाटविण्याचें ठरलें. त्याप्रमाणें पुढील रविवारीं बाटवावें असें रेवदंड्याचे फिरंगी याचे अधिकाऱ्यांकडून उरणच्या अधिकाऱ्यांस लिहून गेलें. हें मल्हार नारायण यांस कळलें. तेव्हां या संकटांतून कसें मुक्त व्हावें या बद्दल तो देवांचा धांवा रात्रंदिवस करूं लागला. कित्येक वेळां देवहि करुण कहाणी ऐकून संकटांतून मुक्त करितों, त्याचें हें उदाहण आहे. मल्हार-नारायण जात्या हुशार, मन मिळावू. बोलण्याची छाप प्रतिपक्षावर त्वरित पाडणारी त्याची वाचा. ह्यामुळेंच तो आजपर्यंत वैभवास चढला होता. तो सुमारें महिनाभर उरण ( बोरींत ) अटकेंत ( पहाऱ्यांत ) होता, तेव्हां त्याजकडे शेजारील कांहीं लोक बसण्यास येत असत. त्यांत एक भंडारी त्याच्या बऱ्याच परिचयाचा झाला होता. त्यास मल्हार नारायण यानें आपणांस अमुक दिवशीं बाटविणार आहेत म्हणून सांगितलें. या संकटातून कसें

मुक्त व्हावें, ह्याचा विचार तो करीत होता. त्या रविवारच्या अघलेंच दिवशीं म्हणजे शनिवारीं त्या भंडाऱ्यानें मल्हारजी जवळ एक रुपाया मागितला. पण त्याजवळ एक कपर्दिकाइ त्या वेळीं नव्हती. तरी त्यानें आपल्या बायकोच्या नाकांतील नथेची वाळी त्या भंडाऱ्यास दिली. त्या भंडांऱ्यानें ती एक रुपयास विकून आठ आण्याची दारू ( मद्य ) घेऊन त्यांत मादक पदार्थ घालून माझ्याघरीं प्रयोजन झालें तेव्हां तुम्हीं माझे दोस्त म्हणोन ते तुम्हांस आणिलें आहे असें सांगून तें मद्य सर्व तेथील चौकीचे पहारेकरी फिरंगी यांस प्यावयास दिलें. फिरंगी मद्याचे शोकीच असल्यामुळें ते यथास्थित प्याले. नाच रंग केला. थोडया वेळानें ते सर्व फिरंगी पहारेकरी बेशुद्ध झाले; हें त्या भंडारी गृहस्थानें पाहून मल्हार नारायण यास त्याच्या बायको मुलांसह तेथून अटकेंतून काढून करंज्याचे बंदरावर नेलें. तेथें एका होडींत घालून माणकोलेच्या खाडींत कनकेश्वराच्या डोंगराच्या पूर्व बाजूस जमीनीवर उतरून त्या होडीवाल्यास त्या भंडारी गृहस्थानें आठ आणे दिले. त्याच होडींत बसून तो गृहस्थ परत उरणास आला.

या प्रमाणें मल्हार नारायण याची आलेल्या अरिष्टांतून मुक्तता त्याच्या मित्रानें केली. तो परत जाऊं लागला तेव्हां त्यास मल्हार नारायण गहिंवरून म्हणाला कीं मला ह्यावेळीं उपकाराची फेड करणें शक्यच नाहीं; पण जेव्हां शक्य होईल तेव्हां मी करीन अगर माझे वंशांत कोणी तरी करतीलच. त्या भंडारी गृहस्थासहि एक महिन्याचा अनुभव आलेला होताच. होणाऱ्या वियोगाबद्दल त्यास सहाजिकच वाईट वाटलें. असो! उभयतां ते आपआपल्या मार्गाकडे जाऊं लागले. भंडारी गृहस्थ आपल्या स्वस्थळास आला. एका भल्या गृहस्थास त्याच्या कुटुंबासह आपण विजातीय होऊं न देतां त्यास आपल्या मायभूमीकडे रवाना केलें म्हणून तो आनंद मानीत होता. तद्वत् मल्हार नारायणहि आपण आपल्या बायको मुलासह विजातीय होण्याच्या प्रसंगांतून मुक्त झालों म्हणून त्या गृहस्थाचें व परमेश्वराचे आभार मानून रात्रीच्या प्रहरीं आश्रयास बायका मुलांसह कोठें जावें या विचारांत होता. नंतर चार दिवस चऱ्ही नजीक कृष्णाजी प्रभु या नांवाच्या गृहस्थाकडे मुक्काम करून होता. फिरंगी तपासाअंतीं पुन्हां पकडून नेतील म्हणून तो चोरून लपून रहात असे. तो चौलास रात्रींच्या वेळीं जाऊन राही. तो दिवसा बाहेर पडत नसे. काम

काज वगैरे रात्रीं करी. हा कार्यक्रम कांहीं दिवस चालू होता.

वरील संकटांतून मल्हार नारायणाची सुटका झाली तर दुसरेंच अरिष्ट त्याजवर आलें. तें असें: पद्मदुर्ग किल्ल्यावर शिद्दीचा हल्ला होऊं लागला, तेव्हां किल्ला सिद्दीच्या ताब्यांत जाण्यापेक्षां आंग्र्याच्या स्वाधीन करावा म्हणून, त्यानें कान्होजी आंगऱ्यास पत्र लिहिलें होतें; पण कान्होजी आंगरे येण्यापूर्वींच सिद्दीनें किल्ला हस्तगत करून घेतला हें वर दिलेंच आहे. तेव्हां आम्हांस बोलाविलें असतांना किल्ला सिद्दींचे स्वाधीन केला, हा रोष मनांत धरून कान्होजीनें मल्हार नारायण यांस पकडून कैद केलें. तेथें तो चार वर्षे कैदेंत होता. छत्रपतींचे चिटणीस कुलाब्यास आले त्यांच्या भेटीस मल्हार नारायणाचा मोठा मुलगा गोविंद मल्हार आला व त्यानें आपल्या वडिलांची पूर्व हकीकत शिवाजी महाराजांचे वेळेपासूनची सर्व सांगून सुटकेची याचना केली. त्यावेळीं आंगऱ्यांचें कारभारी रघुनाथ चिमणाजी प्रभु यांस चिटणीसांनीं मल्हार नारायण संबंधीं विचारिलें. त्यानें आंगऱ्यांचा रोष म्हणून कैद केलेले आहेत, म्हणून सांगितलें. त्याची सुटका चिटणीसांनीं छ. शाहूमहाराजांकडून करविली; आणि गोविंद मल्हार शरीरानें सुंदर, सुदृढ, त्याचें हस्तअक्षर चांगलें असें पाहून त्यास त्यांनीं आपणाबरोबर नेलें. त्यास निळो बल्लाळाची मुलगी देऊन चिटणीसांकडे रोजगारावर ठेविलें.

वरील चौलकर चौबळांची माहिती चा. का. प्रभूंच्या इ. सा. अं. १२ यावरून दिली आहे. शिलाहार चौबळ घराणें, राज्याच्या कारकीर्दींत "देशपांडे" पणाचें वतन संपादन केल्याचा उल्लेख सरकारी दप्तरीं नोंदलेला आहे. आणि चौल नजीक ब्राह्मण टपा उमटा टपा व मांडल टपा या तीन महालाचें कुळकर्णपणाचें हक्क बहामणी राज्यापासून यानें संपादन केलें. यापैकीं दोन गांवचे देशपांडेपणाचे हक्क चालूच असून हल्लीं सरकारांतून पेटाखात्यांतून त्यांचे वंशज आज घेत आहेत. यावरून हें घराणें महाराष्ट्रांत किती पुरातन आहे याची कल्पना वाचकांस होईल. या घराण्याचा जरूरी पुरता वंशवृक्ष शेवटीं दिलाच आहे. तो वाचकांनीं पहावा.

चौलप्रांतच नव्हे तर सर्व कोंकणपट्टी यावेळीं आंगऱ्यांचे ताब्यांत होती. शिद्दी व आंगरे, छत्रपति व शिद्दी यांचे वारंवार कोंकणपट्टींत झगडे होत

असत. छत्रपति शाहूमहाराजांचेतर्फे पहिले बाजीराव पेशवे, चौल प्रांतीं आले असतां, मल्हार नारायण याचा भाऊ सूर्याजी नारायण यानें पेशव्यांस चांगलीच मदत केली. त्याची हुशारी व समयसूचकता पाहून, बाजीराव पेशव्यांनीं सूर्याजी नारायण, यास आपल्याबरोबर नेऊन आपल्या चिटणीसी दप्तरांत लिहिण्याकडे ठेविलें. त्याचा मुलगा **त्रिंबक सूर्याजी** बाजीराव पेशव्यांचें स्वारींत लष्करांत राहिला. त्यानें अनेक लढयांत पराक्रम केल्यानें बाजीराव पेशव्यांच्या तो नजरेस आला होताच. यापुढें चरित्र नायकाच्या पराक्रमाचा ऐतिहासिक पुरावा आहे. तो विशेष महत्वाचा आहे. बाळाजी बाजीराव पेशवे यांस हिंदूंचीं देवस्थानें आपल्या ताब्यांत असावींत अशी प्रबळ इच्छा झाली. त्या पैकीं श्रीत्रिंबकेश्वराचें डोंगरांतील, क्षेत्र गोदावरी उत्पत्तिस्थान व ज्योतिर्लिंग हीं महत्वाचीं होत. प्रथम त्रिंबकेश्वराचा किल्ला घेतल्यावांचून तेथील लहान लहान किल्ले व कोळवण प्रांत आपल्या ताब्यांत राहणें शक्य नाहीं हें नानासाहेबांस दिसत होतें, कारण यावेळीं हा नाशीक प्रांत मोंगलव्याप्त होता. इतकेंच नव्हे तर तेथें त्यांचा अमल दृढ झाला होता. म्हणून ह्या कामगिरीवर पेशव्यांनीं त्रिंबक सूर्याजीची खास नेमणूक केली. कोणतीहि कामगिरी आपल्या धन्याच्या हितासाठीं किंवा मर्जी संपादण्यासाठीं स्वीकारिली तरी पण ती यशस्वी होण्यास कौशल्य किंवा बुद्धि चातुर्याची जोड असावी लागते. केवळ शौर्यावरच यश मिळतें असें नाहीं, याची जाणीव त्यास चांगलीच होती. त्रिंबकराव जितका शूर व धाडसी होता, तितकाच तो धूर्त होता. तो ज्या मोहिमेवर जाई, ती प्रथम नीट आकलन करी, आणि कोणत्या परिस्थितींत गेले असतां आपला कार्यभाग साधेल हें ठरवून नंतर पुढें पाऊल टाकी. याचप्रमाणें या त्रिंबकेश्वरावरील स्वारीचा कोणता मार्ग स्वीकारावा हें प्रथम त्यानें विचारपूर्वक ठरविलें. त्यास तेथें गेल्यावर आढळून आलें कीं तेथें मोगलांचा सक्त बंदोबस्त असून त्यांची छावणी ठोकून बसलेली फौज बरीच मोठी आहे; कारण उत्तरेंतून दक्षिणेंत येण्याजाण्याचा हा दिंडी दरवाजाच आहे. तेव्हां त्यांच्याबरोबर आपल्या तुटपुंजा सैन्यासह लढणें शक्य नाहीं. युक्ति प्रयुक्तीनें आपला कार्यभाग साधतां आला तर बरें. तेणेंकरून आपली मनुष्य हानि होणार नाहीं. तसें शक्य न झाल्यास दोन हात करणें भागच आहे. असें ठरवून तो

६६२८

त्या प्रयत्नास लागला. त्यानें प्रथम किल्ला भेद करून घेण्याचें ठरविलें. तेव्हां त्यास किल्ल्यांतील पुजारी व वजनदार गृहस्थ "नारो दामोदर जोगळेकर" ( हल्लीं त्रिंबकेश्वरीं जोगळेकर जहागीरदार आहेत त्यांचे पूर्वज ) साह्यास मिळाला. त्यानें किल्ल्यांतील सर्व माहिती त्रिंबक सूर्याजीस दिली व तेथील लोकांत भेद करण्याचें कबूल केलें. संकेताप्रमाणें त्रिंबक सूर्याजी एका काळोख्या रात्रीं किल्ल्याच्या तटास दोर लावून आपल्या निवडक लोकांसह किल्ल्याच्या तटावरून चढून गेला. त्याने आंत अचानक हल्ला चढविला. त्या मुळें किल्ल्यांतील सैन्य व पाहरेकरी किल्ल्याचा दरवाजा मोकळा करून किल्ल्याखालीं पळून गेले. कित्येक शत्रूबरोबर लढूंहि लागले. पण त्यांस मदत नसल्यामुळें ते मारले गेले. या हल्ल्यांत त्रिंबक सूर्याजीचा भाऊ सुंदराजी हा पडला. त्याच्या नांवाचा टांक केलेला असून त्रिंबक सूर्याजीचे वंशज आपल्या कुळस्वामीबरोबर देव्हाऱ्यांत तो पुजितात.[1]

या प्रमाणें त्रिंबक सूर्याजीनें, त्रिंबकचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. ( १७५० ) या संबंधी " श्रीमंत जोगळेकर जहागिरदार, त्रिंबक " यांचे कडील बखरींत पुढील माहिती आहे:- " त्रिंबकची जागा किल्ल्यासुद्धां मोगलाई अमलांत असून पेशवे सरकारचे मर्जीत फार दिवस हस्तगत होण्याचें कारण क्षेत्र श्री गोदावरी उत्पत्तिस्थान व ज्योतिर्लिंग श्री त्र्यंबकेश्वर आणि हा किल्ला ताब्यांत आल्या वेगळें (वांचून) या लगत वगैरे लहानसान किल्ले व कोळवण मुलखाचा बंदोबस्त राहणार नाहीं, म्हणून समजल्यावर सदरहू किल्ला हस्तगत होण्याचें कारस्थान चालविलें त्या कामांत **त्रिंबक सूर्याजी** म्हणून नांवाचा गृहस्थ ज्ञाति प्रभु **रा. कोंकणांतील** याचा एक सल्ला घेऊन किल्ल्याकडील लोकांत भेद म्हणजे फितुर करण्याची तजवीज चालवून कांहीं शिबंदीचा जमाव किल्ल्याचे आसपास व त्रिंबकांत गुप्तपणें तयार करून ठेवल्यानें दरम्यान फितूर सिद्ध होतांच, एके दिवशीं रात्रौ किल्ल्यास माळ लावून एकाएकीं वरती चढून गेल्यावर बेफाम असणारे लोकांस तशांत रात्रौ यामुळें घाबरणारांस जमेत असली तर बहोत दिसोन

---

१ हें याच घराण्यांतील विद्यमान वंशजानीं प्रस्तुत लेखकांस सांगितलें आहे.

त्यांचा नाइलाज होतो. तसें झाल्यावर लोक आपला जीव बचावण्याची इच्छा करूं लागलेंले पाहून मसलतीचें तजवीजीनें हत्यार चालविता त्यास काढून दिलें आणि किल्ल्याचा बंदोबस्त केला. ”

वरील वर्णनाप्रमाणें त्रिंबकचा किल्ला सर करितांना, त्रिंबक सूर्याजीनें मोंगलाच्या अफाट व कडव्या सैन्यास न जुमानितां व आपल्या सैन्याची विशेष हानी न करितां मोठ्या कुशलतेनें तो ताब्यांत घेतला. हें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस कळविल्यावर ते प्रसन्न झाले या त्याचे कामगिरीबद्दल त्यांनीं त्यास **परळी गांव** वंशपरंपरेनें इनाम देऊन त्रिंबकच्या किल्ल्याची हवालदारी दिली. या संबंधीं पुढील माहिती महत्वाची आहेः–

॥ श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर ही जागा किल्ल्यासुद्धां पेशवेसरकारांत आल्याचे विदित जालेवर मर्जी संतोष होऊन खुद्द नानासाहेब म्हणजे बाळाजी बाजीराव समागमे भाऊसाहेब यासह स्वारी क्षेत्र मजकुरीं येण्याचे दिवशीं शिरस्तेप्रमाणें पुढें सामोरे जाऊन नजराणे भेटी होतांवेळेस सत्कार ताजीम आणि कुशल प्रश्नाचे गौरवयुक्त भाषण होऊन खासा स्वारी क्षेत्रीं दाखल जाल्यावर सांप्रदायाप्रमाणें तीर्थ प्रयुक्त धर्म कार्य होणें ती होऊन किल्ले मजकुर हा सर करून सरकारांत आल्याचें कारणानें बहुमान वस्त्रे “ नारो दामोदर ” व “ त्रिंबक सूर्याजी ’ यांजला होऊन इनाम गांव पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें जमेस पुढे वाढण्यासारखें आणि रहाण्याचें गांव लगत असे मौजे तळेगांव परगणे त्रिंबक हा गांव नारो दामोदर यांस व त्रिंबक सूर्याजी यांस मौजे परळी कोंकणांत कल्याण लगत जांभूळपाडया नजीक याप्रमाणें मिळाले. या शिवाय अधिकार दूरकी निरंतर चालणेचे असें नेमण्यांत किल्ले मजकुरचे हवालदारीचा अधिकार त्रिंबक सूर्याजीकडे व सबनिसांचा अधिकार नारो दामोदर याजकडे असे चालू केले ” ( कि. )

श्री. नानासाहेब पेशव्यानीं त्रिंबक सूर्याजी त्यास परळी गांव इनाम दिला. त्याबद्दल तेथील अधिकाऱ्यांस आज्ञापत्र सादर केलें ते पुढील-प्रमाणें आहे:––

श्री

सोमवार अधिक जेष्ठ शु. १ १६७७
[ ता. १३ मे १७५५ ]

राजश्री सूर्याजी नारायण हवालदार व लेखक वर्तमान भावी प्रां।। सी महाल गोसावी यांसी——

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री राणोजी बालकडे सुभेदार मामले अमिनाबाद ऊर्फ पाल प्रांत चेऊल रामराम सु।। सीत खमसेन मया व अलफ. रा।। त्रिंबक सूर्याजी कुळकर्णी ता ब्राह्मणगांव व उमटे मामले चेऊल यांनीं हुजूर कसबे पुण्याचे मुकामीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंति केली कीं, आपण पुरातन स्वामीचे राज्यांतील सेवक येकनिष्ठपणें सेवा करीत आलो. श्रम साहस बहुत केलें. कुटुंब वत्सल आहों. कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे. तरी स्वामीनीं कृपाळू होऊन कुटूंबाचे संरक्षणार्थ नूतन गांव इनाम करार करून दिला पाहिजे म्हणून. त्याजवरून हे राज्यांतील सेवक यांचे वडिलांनीं सेवा बहुत केली व यांनीं येकनिष्टपणें सेवाश्रम साहास बहुत केले. कुटुंब वत्सल आहेत, कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे, हें अवश्य जाणून श्रीमंत स्वामी याजवर कृपाळू होऊन मौजे परळी ता मजकूर हा गांव स्वराज्य व मोगलाई दुतर्फा देखील सरदेशमुखी व साहोत्रा खेरीज हक्कदार व ईनामदार कुलबाब कुलकानु हल्ली पटी व पेस्तर पटी देखील इनाम तिजाई दरोबस्त जलतरु पाषाण निधि निक्षेप आदि करून इनाम दिला असे. येविसी हुजूरची सनद सुभा सादर असे. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी मौजे मजकूर यांचे दुमाला करून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें इनाम चालवणें. जाणिजे. छ २९ माहे रजब बहुत काय लिहिणें.

मोर्तब
सुद

वरील आज्ञापत्र त्या प्रांताच्या हवालदारास परळी गांव त्रिंबक सूर्याजीस इनाम दिल्याचें आहे. पण हा सर्व प्रांत कुलाब्याचे आंगरे सरकारच्या प्रांतांतील असल्यामुळें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांकडून श्री. मानाजी आंगरे यांस आज्ञापत्र लिहिलें गेलें तें--

नकल

सिक्का

श्री

रविवार श्रावण शु. ३ शके १६७७
[ ता. २० आगष्ट १७५५ ]

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री मानाजी आंगरे वजारतमाब ताा मोकदम मौ। परळी त।। आश्रे आधारणे मामले अमिनाबाद उर्फ पाली प्रांत चेऊल सुा सीत खमसेन मयाव अलफ. राजश्री त्रिंबक सूर्याजी कुळकर्णी ताा ब्राह्मणगांव व त।। उमटे याणीं स्वामीच्या राज्यांत एकनिष्ठपणें सेवा केली याजवरून राजश्री पंत प्रधान याणीं मौजे मजकूर हा गांव म।। निलेस योगक्षेमार्थ इनाम दरोबस्त कुलबाब कुलकानु हलीपटी व पेस्तरपटी देखील जलतरू पाषाण निधिनिक्षेप आदिकरून इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरानें करून दिल्हा असे. सरकारतर्फेसहि म।। रनिलेची निष्ठा आहे म्हणोन कृपाळू होऊन मौजे मजकुरीं सरकार बाब सरदेशमुखी व अगरपटी आहे ते इनाम करार करून दिल्हे असे, तरी साल मजकूर पासून तुम्हीं म।। निलेसी रुजू होऊन साल दरसाल अगर पटी व सरदेशमुखीचा आकार होईल तो यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालविणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत करून घेऊन अस्सल परतोन भोगवटी यास देणें. रा छ. १ माहे जिलकाद.

मोर्तब
सुद

श्रीमंत पेशवे सरकारचें आज्ञापत्र श्री. मानाजी आंगरे वजारतमाव यांस गेलेलें वर दिलेंच आहे. त्या आज्ञापत्राप्रमाणें श्री. मानाजी आंगरे यानें आपले आश्रित परळी गांवचे अधिकारी यांस आपले आज्ञापत्र पाठविलें तें पुढीलप्रमाणें आहे:--

श्री

गुरवार श्रावण व. ६ शके १६७७

[ता. १८ सप्टेंबर १७५५]

छ म।। अजम जमीदार ता।। आश्रे आघरणे मामले अमिनाबाद उर्फ प्रांत चेऊल यास मानाजी आंगरे वजारतमाब सु।। सीत खमसेन मया व अलफ राजश्री त्रिंबक सूर्याजी कुळकर्णी ता।। ब्राह्मणगांव व ता।। उमठे याणी स्वामीचे राज्यांत एकनिष्ठपणें सेवा केली याजवरून राजश्री पंतप्रधान याणी मौजे परळी ता।। मजकूर हा गांव दरोबस्त कुलबाब कुलकानु हलीपटी व पेस्तर पटी देखील जलतरु पाषाण निधिनिक्षेप आदि करून इनाम पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेने करून दिल्हा आहे. सरकार तर्फेसहि मा। बिलेची निष्टा आहे म्हणोन कृपाळू होऊन मौजे मजकुरीं सरकारबाब सरदेशमुखी व अगरपटी आहे ते इनाम करार करून दिल्हे असे. तरी साल मजकुरापासून साल दरसाल अगरपटी व सर देशमुखीचा आभल होईल तो पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम खर्च लिहीत जाणें. दरसाल नूतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रत करून घेऊन असल पत्र परतोन म।।रनिलेजवळ भोगवटीयास देणें. रा छ १९ माहे जिलकाद बाद सुध

मोर्तब
सुद

वरील आज्ञापत्रें श्रीमंत पेशव्यांकडून श्री. मानाजी आंगरे व तेथील

अधिकारी यांस गेलीं होतीं. परंतु या ( परळी गांवाच्या ) इनामासंबंधीं खुद्द त्रिंबक सूर्याजीस आज्ञापत्र अगर इनामाची सनद पेशव्यांकडून मिळालेली खालीं दिली आहे:--


श्री

राजाराम नरप
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव प्रधान

मंगळवार भाद्रपद वद्य ३
शके १६७७
[ ता. २३ आक्टोबर १७५५ ]

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य बाळाजी पंडित प्रधान ता।। मोकदम मौजे परळी तर्फ आसरे आधारणे मामले अमिनाबाद उर्फ पाली प्रांत चेऊळ सुा सीत खमसेन मया व अलफ. राजश्री त्रिंबक सूर्याजी कुलकर्णी तर्फ बामणगांव व उमटे मामले चेऊल यांणीं हुजूर कसबे पुण्याचे मुकामीं येऊन विनंति केली कीं आपण पुरातन स्वामीचे राज्यांतील सेवक आपले वडिलांनीं सेवा बहुत दिवस केली व आपणहि येकनिष्ठपणें सेवा करीत आलो. श्रमसाहास बहुत केलें. कुटुंबवत्छल आहों. कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे. तरी स्वामीनी कृपाळू होऊन कुटुंबाचे संरक्षणार्थ नूतन गांव इनाम करार करून दिला पाहिजे म्हणोन. त्याजवरून मनास आणितां हे राज्यांतील सेवक यांचे वडीलांनीं सेवा बहुत दिवस केली व यानीं येकनिष्ठपणें सेवाश्रम बहुत केले. कुटुंबवत्छळ आहेत. कुटुंबाची योगक्षेम चाललीं पाहिजे हें अवश्य जाणून याजवर कृपाळू होऊन मौजे मजकूर स्वराज्य व मोगलाई दुतर्फा देखील सरदेशमुखी व साहोत्रा खेरीज हाकदार व इनामदार कलबात्र कुलकानु हलीपटी व पेस्तरपटी देखील इनाम सिजाई दरोबस्त जलतरु पाषाण निधिनिक्षेप आदिकरून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम याजकडे चालविणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न

करणें. या पत्राची प्रत लिहून घेऊन असल प्रत म।। निल्हे जवळ भोगवटी यास परतोन देणें. जाणिजे. छ १६ जिल्हेज. आज्ञाप्रमाण.




सदरहू परळीगांव इनाम देणारे पेशवे, पण हा गांव आंगऱ्याच्या ताब्यांतील असल्यामुळें, त्रिंबक सूर्याजीस त्याच्या परवान्याचें आज्ञापत्र श्री. मानाजी आंगरे यांजकडून पाहिजे होतें. त्याशिवाय या इनाम गांवावर सरदेशमुखीचा व अगरपटीचा हक्क आंगऱ्याचा होता तो पेशव्यांस माफ करिता आला नाहीं, तो माफ करावा म्हणून त्रिंबक सूर्याजीनें श्री मानाजी आंगरे याजकडे विनंति अर्ज केला होता. त्याचे उत्तर दोन्ही करपट्या माफ केल्याचें आज्ञापत्र मिळालें तें पुढीलप्रमाणें आहे:--

श्री

राजश्री त्रिंबक सूर्याजी कुलकर्णी त।। ब्राम्हणगांव त।। उमटे मामले चेऊल गोसावी यांसी--

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नें।। मानाजी आंगरे वजारतमाव रामराम स।। सीत खमसेन मया व अलफ तुम्हीं हुजूर कुलाबाचे मुकामी येऊन विनंति केली कीं, आपण पुरातन स्वामी चे राज्यांतील सेवक आपले वडिलांनी सेवा बहुत दिवस केली व आपणहि एकनिष्ठपणे वर्तत आहा. श्रम साहस बहुत केले. कुटुंबवत्सल आहो योगक्षेम चालला पाहिजे म्हणोन राजश्री पंतप्रधान कृपाळू होऊन मौजे परळी त।। आश्रे आधारणे मामले अमिनाबाद उर्फ पाल प्र।। चेऊल हा गांव दरोबस्त कुलबाब कुलकानु हल्लीपटी पेस्तरपटी देखील जलतरु पाषाण निधिनिक्षेप

आदिकरून इनाम पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करून दिल्हा आणि प्रांत मजकूरचे देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी य।। स पत्रे सादर केली येशास आपण पदरीचे सेवक यास्तव कृपाळू होऊन मौ।। मजकुरावर सरकारतर्फेची सरदेशमुखी व अगर पटी इनाम वंशपरंपरेने दिल्ही पाहिजे त्याजवर म।। निलेचे येकनिष्ठवर नजर देऊन सदरहू बाब करारी करून दिल्हा असेत तरी पुत्रपौत्रादि वंशपरपरेनें उपभोग करणे र।। छ माहे जिलकाद.

मोर्तब
सुद

एकंदरींत विस्तार करितां त्रिंबक सूर्याजीनें मोठ्या बिकट परिस्थितींतून त्रिंबकचा किल्ला जिंकून घेतला. त्याच्या महत्वाची किंमत व तो किल्ला व किल्ल्यांतील पवित्र देवस्थानें आपल्या ताब्यांत असावींत ही नानासाहेब पेशव्यांची प्रबळ इच्छा होती, ती सफल झाली. आणि म्हणूनच त्यांनीं त्यास परळी गांव वंशपरंपरेनें इनाम दिला. अशीं थोडींच उदाहरणें त्यांनीं इनाम दिल्याचीं सांपडतील ! असो ! वरील सनद मानाजी आंगरे यानीं सर्व कर, या गांवचें माफ केल्याची आहे. सांप्रत परळी गांव भोर संस्थानांत पंतसचीवाच्या हद्दींत असून त्याचें इनामाचें उत्पन्न संस्थानाकडून त्रिंबक सूर्याजींचें वंशज घेत आहेत.

त्रिंबक सूर्याजी, त्रिंबकच्या किल्ल्याचा हवालदार असतांना जव्हार संस्थानाचा अधिपति " कृष्ण शाहा " यास पैशाची जरूर असल्यामुळें त्यानें त्रिंबक सूर्याजीकडून दोन हजारांची रक्कम दोहोत्रा व्याजानें प्रथम कर्जाऊ घेतली. त्या रकमेचें अस्सल कर्जखत उपलब्ध झालें आहे तें:--

श्री

[ २७ जुलई इ. सन १७५२ ]

शके १६७४ अंगिरानाम संवत्सरे माहे आषाढ वद्य द्वादसी १२[1] ते दिवसीं

---

१ या वर्षाच्या अधिक आषाढाच्या व।। १२ स ता. २७ जून इ. स. १७५२ येते व आषाढ व।। १२ स ता. २७ जुलई येते.

खत लिखिते धनको नाम राजश्री त्र्यंबक सूर्याजी सुभेदार किल्ले त्र्यंबक यासी रिणकोनाम कृष्णशहा राजे प्रो जवार आत्मकार्य घेतले मुदल रुपये २००० अंके दोन हजार यास व्याज हरमहा दरसदे रु॥ दोन दुहोत्राप्रमाणें व्याज मुद्दल सुधा भरून देऊं हे खत लिहिले सही.

बार ( शिक्यांतील अक्षरे लागत नाहींत )

या खेरीज आणखीहि रक्कम राजेसाहेबानीं त्रिंबक सूर्याजी जवळून घेतल्याचे व व्याजाचा वगैरेचा हिशेब केल्याचेहि लेख आहेत. पण ते सर्व येथें देणें महत्वाचें नसल्यामुळें देत नाहीं. त्रिंबक सूर्याजी या कोळवण प्रांतीं बराच प्रसिद्धीस आलेला असून त्याचा वचक चांगलाच बसला होता. आणि म्हणूनच नानासाहेब पेशव्यानीं त्यास त्रिंबकच्या किल्ल्याच्या सुभेदारीवर ठेविला होता.

याच सुमारास श्री. रघुनाथरावदादा गुजराथचे स्वारीवर गेले होते त्यांजबरोबर त्रिंबक सूर्याजीहि गेला असावा. याचवेळीं जव्हार संस्थानच्या गादीसंबंधीं बखेडा झालेला होता. सदरहू संस्थानची एक वारस "राणी मोहनकुवर" हिला गादीवर बसण्याची इच्छा होती. आपलें काम जर कोणी करील तर तो त्रिंबक सूर्याजी करील अशी तिची खात्री होती. तिनें आपलें म्हणणें त्याला प्रथम कळविलें. इतकेंच नव्हे तर आपणांस गादीवर बसविल्यास आपण वीस हजार रुपये नजराणा देऊं, असें सांगितलें. तथापि तो स्वतः मालक नव्हता, आणि म्हणून त्यानें प्रथम रघुनाथराव तिकडे होतेच, त्यांस राणी मोहनकुवरचें म्हणणें कळविलें. तेव्हां रघुनाथरावांनीं ही हकीकत नानासाहेबांस कळवून त्यांच्या मताप्रमाणें करावें असें सांगितलें. त्याचें अगोदर रघुनाथरावास राणी मोहनकुवर बाईचें म्हणणें काय आहे हें समजाविण्याकरितां, श्री. रघुनाथरावांकडे बोलणें करण्याकरितां, मनुष्य पाठविण्यास सांगण्यांत आलें होतें त्याप्रमाणें राणी मोहनकुवर हिनें आपल्यातर्फे दोन मनुष्यें येसाजी अवधूतराव व देवाजी अवधूतराव यांस पाठविलें. त्यावरून रघुनाथरावांची खात्री पटली. त्रिंबक सूर्याजी यानें मनांत राणीकडून रोख रुपये वीस हजार नजराणा न घेतां वावेरा व वाशेला हे

दोन परगणे घ्यावे, हे परगणे तिनें दिल्यास तिला गादीवर बसवावें, असें होतें. त्याप्रमाणें पेशव्यास कळविण्यांत आले. यावेळीं राणी मोहनकुवर जव्हार संस्थानांत राहत नसून गुजराथेंत पारडी या गांवीं राहावयास गेली होती. त्रिंबक सूर्याजीच्या पत्रांस श्री. नानासाहेब पेशव्यांकडून खुलासेवार उत्तर आलें तें खालीं दिल्याप्रमाणें:—

श्री

शनिवार श्रावण शु. १३ शके १६७५

[ ११ आगष्ट १७५३ ]

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री त्रिंबक सूर्याजी गोसावी यास स्ने ।। बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सु ।। आर्बा खमसेन मया व अलफ. तुम्हीं विनंति पत्रें पाठविलीं तीं पावलीं. मोहन कुवर राणी जवारकर याजकडून येसाजी अवधूतराव व देवाजी अवधूतराव श्रीमंत दादासाहेबाकडे गेले वर्तमान निवेदन केलें व आम्हीं गेल्यावर आम्हांसहि मजकूर विचारला व राजश्री शंकराजी केशव आमदाबादेच्या मुकामी गेले होते तेव्हां दादासाहेबांस निवेदन केलें कीं मोहन कुवर राणी जवारकर हल्ली पारडीस आहे तिची स्थापना करावी वीसहजार रुपये नजराणा देतात त्यास सेवकानीं दादासाहेबांस विनंति केली कीं मोहन कुवरबाई वाघेरा किला सरकारांत देणार किफायत गोष्ट असेल तर ते करावी त्याजवरून वीसहजार रुपये न घ्यावे किल्ला सरकारांत घ्यावा असा विचार करून मोहनाबाईचा बंदोबस्त करून तूर्त त्यांचा खर्च चालला पाहिजे याजकरितां प ।। वाघेरे व प ।। वाशेले हे दोन परगणे जप्त करावयास सेवकास आज्ञा केली. सेवकानीं आज्ञे प्रमाणें जप्त केले. जवारकर सेवेसी लिहितील याजकरिता त्यास ही ताकीद पत्र पाठवावे म्हणोंन लिहिले ते कळले. येशिवाय वाघेरा किला सरकारांत ठेऊन मोहनाबाईचा बंदोबस्त करून द्यावा त्याची स्थापना करावी हा विचार. चिरंजीव दादानीं दोन परगणे जप्त करविले उत्तम असे चिरंजिवाचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करणें जवारकरासहि ताकीद पत्र पाठविलें असे. व

देवाजी अवधूतराव व सिवराम सनग गार्गाहून रवाना केले जातील सारश परगणे जप्त केल्यानी पुढें पेंच न पडे असा विचार चितांत आणून व चिरंजीवानी आज्ञा केली असेल त्याप्रमाणे करणें जाणिजे छ ११ सवाल पैवस्ती छ २७ माहे मजकूर

लेखन सीमा

ता. ११ ऑगस्ट इ. स. १७५३ वरील श्री. पेशव्यांच्या आज्ञापत्रा प्रमाणें त्रिंबक सूर्याजीनें मोहनाबाईस जव्हारच्या गादीवर बसविलें व तिजकडून वाघोरा किल्ला व तो परगणा घेतला. हें पेशव्यांस श्री रघुनाथ-रावानें लिहिल्या पत्राच्या उत्तरावरून स्पष्ट होतें. त्याच्या बंदोबस्तास त्रिंबक सूर्याजी तिकडेच राहिला; कारण त्यावेळीं गुजराथेंतील रघुनाथराव दादांची कामगिरी आटोपली होती व त्यांस परत येण्यास आज्ञा झाली होती. पेशव्यांचीं पत्रें सन १७५६ च्या छ ९ शाबानला रवाना झाली ती छ ३ रमजानला पावलीं. त्यांचें उत्तर श्री. रघुनाथराव दादानें छ ६ रमजानला लिहिलें. त्यांतील मजकूर " इकडील गुत्ता सर्व उरकला. फौज मात्र इकडे ठेवावी ते ठेऊन मजल देश + होईल लिहिले त्यावरून कळले. वरकड इकडील सविस्तर अलाहिदा पुरवणी पत्रावरून विदित होईल राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा ( वगैरेस ) पत्रें पाठविली आहेत. त्याजकडे रवाना करणे म्हणोन आज्ञा. + आज्ञे प्रमाणें ज्यांची त्याजकडे पत्रें रवाना केली. + + वाघेरा किला र ॥ त्रिंबक सूर्याजी यांणीं घेतला आहे. त्याचा बंदोबस्त करण्याविसी जव्हाईरच्या राज्याच्या बंदोबस्ताविसी स्वामीनी आज्ञा पत्र लिहिले तरी आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं + + " ( पे. द. २० प. ८३ )

यावेळीं त्रिंबक सूर्याजी जरी नवीनच ताब्यांत घेतलेला जव्हार संस्थानांतील वाघेरा परगणा व किल्ला यांची व्यवस्था लावीत होता, तरी हा वेळ पर्यंत त्रिंबकच्या किल्ल्याची हवालदारी ( सुभेदारी ) त्याजकडेच होती. म्हणजे त्रिंबकच्या किल्ल्याचा व त्याच्या लगतच्या प्रांताचा बंदोबस्त

ठेऊन, जव्हार संस्थानांतील परगण्याची व्यवस्थाहि तो पहात होता. ह्या खेरीज पेशव्यांचा एक सरदार मुजफरखान याणीं जव्हार संस्थानांतील आणखीं कांहीं ठाणीं व किल्ला घेतला होता. त्याचाहि बंदोबस्त त्रिंबक सूर्याजीनें करायाचा होता तो असाः मजफरखानानें जी ठाणीं व किल्ला घेतला. त्या प्रांतांतील लोक आत्मसंरक्षणाणार्थ परप्रांती निघून गेले होते त्यांस दिलभरंसा देऊन परत आपल्या गांवी आणणें, त्यांची सर्वतोपरि व्यवस्था ठेवणें, परशत्रूपासून त्यांचा बचाव करणें, उद्धस्त झालेल्या ठिकाणीं लोक वस्ती करणें, ओसाड झालेली शेती लागवडीस आणणें, शेतीचें व जकातीचें उत्पन्न वाढविणें. हीं सर्व कामें त्याजवर सोंपविलीं. यावरूनच त्रिंबक सूर्याजी जितका शूर होता तितकाच तो उद्योगप्रिय व प्रजेंत खेळीमेळीनें राहणारा होता हें दिसून येईल. या त्याच्या आंगच्या चतुराईनेंच तों पेशवांईत चमकत होता. हें निराळे सांगावयास नकोच. तो गनीमी काव्यानें लढून अंगावर आलेलें संकट त्वरित निवारण करण्यांत पटाईत होता. प्राणावर संकट ओढवल्यासहि न डगमगणारा तो होता. असा असतांहि तो महाराष्ट्राच्या इतिहासांत आजपर्यंत चमकला नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें. असो. वरील कामगिरी बद्दल त्यास पेशव्यांचे आज्ञापत्र आलें तें असें:—त्रिंबक सूर्याजी किल्ले त्रिंबक यांचे नांवे सनद कीं कृष्णशाराजे यांचे जवारचे ठाणे व परगणे मुजफरखान याणीं सरकारांत घेतले बितपसील. १ परगणे जवार हवेली ठाणे सुद्धां, १ परगणे देहरजे, १ परगणे तलवडे, १ परगणे गंजड, एकूण चार परगणे व गडी जवारची देखील जकात यासी कमाविसी तुम्हांस सांगितली असे. तरी सदरहू प्रमाणें परगणे व गडी मुजफरखान तुमचे हवाली करतील त्याची लावणी करून कीर्द अबादानी करणें, रयतेस कौल दिला आहे. त्या प्र ॥ रयत आणून परगणीयांत वसत करणें म्हणोन. परवानगी रुबरू. सनद.

मुजफरखान यास सनद कीं र॥ त्रिंबक सूर्याजी याजकडे सदरहू ठाणे व परगणे हवाला करून त्याजकडून बंदोबस्त करणें म्हणून सनद परवाना रुबरू" ( पे. रो. स. १७५८–५९ )

वरील पेशव्यांच्या आज्ञापत्राप्रमाणें त्रिंबक सूर्याजी सदरहू परगणे व ठाणीं ताब्यांत घेऊन त्यांची व्यवस्था करू लागला. नंतर त्यानें गढी ताब्यांत

घेतली. ती गढी म्हणजे फक्त बाजूचीं भिंताडे. उभी होतीं. आंत तोफा; भांडेकुडें मौल्यवान वस्तु तर नव्हत्याच. पण केरसुणीपासून सुताच्या धाग्यापर्यंत कांहीच वस्तु, मुजफरखानानें ठेविल्या नव्हत्या, त्यासंबंधीं त्यानें पेशव्यांस पत्र लिहिलें तें विशेष मौजेचें असल्यामुळें सर्वच येथें देतों. तद्वत यां कामगिरीकरितां त्यांनीं गाडदी व इतर लोक चाकरीस ठेविले होते, त्यांस खर्चास देण्यास अगर पगार देण्यास द्रव्य नसल्यामुळें पेशव्यांकडे पैशाची मागणीहि त्यानें केली होती; कारण ह्या परगण्यांतून खंडणी अगर कर वसूल करण्यासारखें उत्पन्न नव्हतें, हें वरील माहितीवरून कळेलच.

श्री

११–१–१७५९

सेवक त्रिंबक सूर्याजी मु॥ जवार × × र॥ बालाजीबाबा बरोबर पत्रें पाठविलीं तीं व जवारचे गडीच्या सनदा पाठविल्या त्या पावल्या व म॥ निलेनीं मुखोत्तर सांगितलें ते कळलें. ऐसी यासी आपले आज्ञे प्रे॥ नबाबास सनद पाठविली ती दिली. त्यावरून त्याणीं गडी आमचे स्वाधीन केली छ ६ जमादिलोवेल गडींत दाखल जाले. त्यासीं गडींतील तोफा व जेजाले बंदुका हत्यार पातेर वस्त्रभाव हांडेभांडे कुल नबाब घेऊन गेले. केरसुणींपासून सुईचा धागा गडींत ठेविला नाहीं. कांहीं किरकोळ हांडेभांडे हातेरे वगैरे होते ते देखील र॥ विष्णु हरि याचे विद्यमाने घेऊन नबाब गेले. गडी खाली करून भिंताडे मात्र आमचे स्वाधीन केली. ऐसीयासी गडीचा विचार आहे. तरी येविसी आज्ञा करणार स्वामी आहेत. स्वारी बरोबर गाडदी व लोक आहेत त्यांसीं खर्चा वेचाची तंगाई बहुत जाली आहे. तरी येविसी पेसजी सेवेसी लिहून पाठविलेंच होतें. हली सेवेसीं लि॥ आहे. तरी स्वामी कृपाळु होऊन खर्चाची बेगमी करून पाठविली पाहिजे. + + ”
( पे. द. २३ प. ९४ )

पेशवाईंत सरदार स्वारीवर गेले म्हणजे आपल्या व सैन्याच्या खर्चाकरितां कर्जाऊ रकम घेण्याची वहिवाट असे व स्वारींतून परत आल्यानंतर



९५९ ... १७।७।

मिळालेल्या लुटीच्या अगर खंडणीच्या रकमेंतून घेतलेल्या रकमेचा हिशेब करावयाचा असे. पण ही खर्चास घेतलेली रक्कम श्रीमंत रघुनाथरावांबरोबर गेलेल्या गुजराथेंतील स्वारी करितां असावी. त्या स्वारींत त्यांस कांहीं लभ्यांश झाला नाहीं. आणि पुढें जव्हार संस्थानांतील परगण्याची व्यवस्था करण्यास त्रिंबक सूर्याजी गुंतला असल्यामुळें, त्यास दरबाराकडून घेतलेल्या रकमेचा हिशेब करण्यास सवड झाली नाहीं. त्याच्याबद्दल दरबाराकडून ता. २२–४– १७६० चें पत्र आलें तें:– "त्रिंबक सूर्याजी यास पत्र सन आर्बा खमसैनांत तुम्हीं सुरतेचे स्वारींस गेला ते समई कर्ज घेतले त्याचे मखलासीचा हिशेब व कर्जाचा हिसेब गुजारतवार माहितगार कारकुना ब ॥ हुजूर पाठविणे व सन सीतामध्यें तुमचे खासगत राऊत करार केले त्याचाहि तैनात जाबता हुजुर पाठविणे म्हणून." ( पे. द. २३ प. ११५ )

यानंतर त्रिंबक सूर्याजीनें आणखी रक्कम राणी मोहनकुवर हिच्या तंट्याच्या वेळीं खर्चाकरितां घेतली होती. त्याच्या हिशेबाकरितां यादी आली तीः– ( १७६०–६१ ) यादी फेरिस्ता ब ॥ खतावणी सन इहिदे सीतैन मया व अलफ.

१ प ॥ गारगांव नि ॥ त्रिंबक सूर्याजी

१ संस्थान जवार नि ॥ मोहन कुंवर

त ॥ स ॥ संस्थान सालमजकुरी सरकारांतून मोहनकुंवर याजकडे दिले असे ॥ ( पे. द. २३ प. २८ )

वरील कर्जास रक्कम त्रिंबक सूर्याजीनें घेतली, ती स्वतःच्या खर्चाकरितां नसून, प्रत्येक कामगिरीच्या वेळीं, स्वार गारदी वगैरेंचा ज्यादा खर्च करावा लागे म्हणून. वास्तविक पाहतां त्रिंबक सूर्याजीस कायमची फौज ठेवण्या करितां, व त्याच्या खर्चाकरितां इनाम जहागीर अशी द्यावयास पाहिजे होती; नानासाहेब पेशव्यानीं त्याची आजपर्यंतची कर्तबगारी जाणून त्यास कायम खर्चाची नेमणूक म्हणून अथवा जहागीर द्यावयास पाहिजे होती; पण श्रीमंतांनीं तसें कांहींच केलें नाहीं. श्री. नानासाहेब पेशव्यांच्या नंतर, माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत श्री. रघुनाथरावदादा पेशवाईचा

कारभार पहात होते. ते कर्तृत्वाचे भोक्ते होते. त्यांस मनुष्याच्या गुणांची पारख होती. गुणी मनुष्याचें चीज करणें हें त्याचें ध्येय होतें. त्यांस जातिमत्सरानें पछाडिलें नव्हतें. आणि म्हणून त्यांच्या हातीं सत्ता येतांच, त्यांनीं, त्रिंबक सूर्याजीचें कर्तृत्व पाहून, त्यास पालखीची तैनात पांच हजारांची करून दिली तीः– ( ता. ३० आक्टोबर १७६२ ) ॥ + + राजमान्य राजश्री त्रिंबक सूर्याजी गोसावी यासीः– श्री ॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद सु ॥ सलास सीतैन मया व अलफ, मौजे कासेगांव प्रो माणिकपुंज हा गांव तुम्हांस जहागीर देखील सरदेशमुखी दिल्हा असे याचा करार रुपये–

| | |
|---|---|
| २००० इनाम दर साल | १२०० कदमी |
| ३००० तैनात देखील पालखी | १८०० जास्ती |
| ——— | ——— |
| ५००० | ३००० |

येकूण पांच हजार रुपयांचा गांव तुम्हांस दिला असे. सदहू गांवचा वसूल आफारामुळें कमी झाला तर कच्चा वसूल मनास आणून तेथील बाबती व मोकासा हर प्रकार ऐवज पुरवून दिल्हा जाईल. ज्याजती झाल्यास सरकारांत घेतला जाईल. जाणिजे छ १२ रबिलावर " ( खं १३· १४प. १०० )

याच मितीचें त्रिंबक सूर्याजीस श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांचें दुसरें पत्र त्रिंबक किल्ल्याच्या कारखानीसाच्या व्यवस्थेबद्दल आलें तें:– ॥ + + त्रिंबक सूर्याजी गोसावी यासी– स्ने ॥ रघुनाथ बाजीराव आशीर्वाद + + किले त्रिंबक येथील कारखानिसी पेशजी पासून गणेश सूर्याजी याजकडे आहे त्या प्रमाणें करार असे तरी तुम्हीं म ॥ निल्हेचे कामकाज घेऊन वेतन पावीत जाणे + छ १२ रबिलाखर " ( कि. प. १०१ )

त्रिंबक सूर्याजी आजपर्यंत त्रिंबकच्या किल्ल्याची सुभेदारी करून खेरीज जव्हार संस्थानांतील परगणे गड वगैरेची व्यवस्था पाहून, त्यांच्या वसूलाचा योग्य भरणा वेळच्यावेळीं पाठवीत असे. त्याची आजपर्यंतची कर्तबगारी

पाहून श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांची त्याजवर पूर्ण मर्जी बसलेली होती. आणि म्हणूनच अशा कर्तबगारीचें चीज म्हणून त्रिंबक सूर्याजीस पांच हजार वसूलाचें गांव त्यांनीं इनाम करून दिलें होतें. पुढें चुलत्या पुतण्यांचा कलह होऊन तो बराच विकोपास गेला. ह्यावेळीं गुजराथेंतील प्रांताचा वसूल श्रीमंत रघुनाथराव पेशवे आपल्या खाजगी खर्चाकरितां घेऊं लागले. पण पेशवाईचा कलह माजल्यामुळें, गुजराथेंतील पेशव्यांच्या प्रांताचा बंदोबस्त अव्यवस्थित झाला व तेथें बरीच अंदाधुदी व बजबजपुरी माजली. गुजराथेंतील डभई, पारनेरा प्रांत विशेष महत्वाचा होता. तो पेशवे व दमाजी गायकवाड यांच्यांत ता. ३० मार्च १७५२ रोजीं झालेल्या कराराप्रमाणें पेशव्यांच्याकडे आला होता. ह्याचें सालीना उत्पन्न २८३४९१८ चें होतें. पण ह्यावेळीं पेशवाईत कलह चालू झाल्यामुळें त्या प्रांतीं ठेविलेले अधिकारी उत्पन्नाचा भरणा व्यवस्थित करीत नसत, त्या मुळें श्रीमंत रघुनाथरावांस, खर्चाची अडचण पडू लागली. तेव्हां या प्रांतीं माजलेली बजबजपुरी मोडून प्रांताचा व किल्ल्याचा योग्य बंदोबस्त करून तेथील उत्पन्न आनंदवल्ली येथें सुरळींत मिळाण्याची कामगिरी त्यांनी आपल्या भरंवशाचा सरदार त्रिंबक सूर्याजी प्रभु यांजकडे सोंपविली. तो सन १७६६त डभईस गेला. तेथील सर्व प्रांताचें अवलोकन करून योग्य तो बंदोबस्त करूम तेथें आपलें नोकर बंदोबस्ताकरितां त्यानें ठेविले., आणि तो आपल्या मुक्काभीं परत आला. तो करारी व आपल्या कामांत दक्ष होता, तसेंच त्याचा नोकरांवर मोठा वचक होता. रघुनाथराव पेशव्यांची त्याजवर बहाल मर्जी बसली होती. तो डभईस गेला, त्या संबंधीं, डभई प्रांताचा पूर्वीचा पेशव्यांतर्फे नेमलेला मनुष्य दादो उद्धव यानें ता. ११–८–१७६६ चें पत्र श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांस लिहिलें तें असें:–

\+ \+ \+

छ २० मोहरमचे आज्ञापत्र छ ३० सफरी सादर जाहलें. तेथें आज्ञा कीं, परगणें डभई येथील साल मजकुरींचा यैवज येणें त्याची नेमणूक किले हायचे बेगमीस

करून देऊन साल मजकुरचे रसदेचा व हप्तेबंदीचा यैवज आनंदवलीस केशो गोविंद याजकडे भरावयासी पत्र नरोतम किशोरदास व त्रिंबक सूर्याजी व सदाशिव हरि कमाविसदार परगणें मजकूर यांस इकडून परभारे पाटविलें आहे."
++ ( पे. द. ३९ प. ६८ )

त्रिंबक सूर्याजी स्वतः आपल्या कार्यांत किती दक्ष होता तद्वत तो आपल्या नोकरांकडूनहि किती दक्षतेनें काम करून घेत असे हें खालीं राघो अनंत याचे सन १६६७ चे डभई येथील पत्रावरून उघड होतें. त्याची नेमणूक रघुनाथराव पेशव्यानीं केली. त्या कामगिरीवर त्यानेंच स्वतःच्या हुकूमानें दुसऱ्या मनुष्याची नेमणूक करावयास पाहिजे होती. तसें झाल्यामुळें त्रिंबक सूर्याजीच्या सांगण्याप्रमाणें त्याच्या कारकुनानें श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांचा हुकूम त्यांस नसल्यामुळें किल्ला ताब्यांत देण्याचें नाकारिलें. प्रा। डभई हे विठ्ठल, हरि, त्रिंबक सूर्याजी या तिघांची सरकत ( वाटेकरी, हिस्सा ) होती ते दूर करून दुसरा मामलेदार पा। व किल्लेदारहि दुसरा पा। ते डभईस जाऊन बसले आहेत; परंतु त्रिंबक सूर्याजी याचे तर्फेनें किले मजकुरी कारकून आहे तो म्हणतो कीं, श्रीमंत दादासाहेबाची सनद आल्यास किल्ला देईन." ( पे. द. ३९ प. ९५ )

त्रिंबक सूर्याजी पेशव्यांच्या नोकरींत असल्यामुळें तो आपल्या इनाम गांवी ( परळीस ) राहत नसे. आपल्या इनाम गांवीं मुखत्यार कारकून व्यवस्था पाहण्यास त्यानें ठेविला होता. शिंदे वगैरे सरदारांच्या फौजा पेशव्यांच्या तैनातीस जात तेव्हां त्या परळी गांवांतून जात येत असत. त्यांच्या स्वार शिलेदारांच्या जाण्यायेण्यामुळें तेथील प्रजेस धास्ती वाटत असे. त्यांस वाटे कीं, हें शत्रुसैन्य लूटमार करण्यास आलें आहे. व तेहि खरें असतेंच; सैन्यांतील लोक नेहमींच स्वारींत गेल्यानंतर दांडगाई करीत असतात. त्याप्रमाणें हें सैन्य जरी शत्रूचें नसलें तरी ते स्वभावानुसार गावांत अगर बाजारांत उपद्रव करीत असे. या त्यांच्या दंग्यामुळे गावांतील

जनसमूह शत्रूसैन्य लूटमार करण्याकरितां आलें असें समजून स्वसंरक्षणार्थ परगांवीं आश्रयास निघून जात, त्यामुळें गांव ओसाड पडे. हें त्रिंबक सूर्याजीस त्याच्या परळी गावांतील मुखत्यारानें कळविलें. तेव्हां त्यानें दौलतराव शिंदे यांस त्यांची भीड न धरितां पत्र लिहिलें कीं, तुमच्या सैन्याच्या जाण्यायेण्यापासून इनाम गावांतील प्रजेस उपसर्ग होतो. त्याचा त्वरित बंदोबस्त करावा. त्याचें उत्तर ता. ५ आगष्ट १६६७ रोजीं त्रिंबक सूर्याजीस आलें कीं, आपल्या सैन्याकडून तुमच्या गावांतील रयतेस यापुढें उपसर्ग होणार नाहीं असें तेथील रयतेस मी आश्वासन दिलेंच आहे व तुम्हींहि आपल्या प्रजेस आश्वासन द्यावें. तें दौलतराव शिंद्याचें अस्सल पत्र खालीं दिलें आहे:—

श्री

जोतिस्वरूप
चरणी तत्पर महादजी
सुत दवलतराव शिंदे
+ निरंतर +

अज सुभा राजश्री दौलतराव सिंदे ता॥ मोकदम मौजे परळी ता॥ अवचितगड सु॥ समान सितैन मया व अलफ सरकारचें स्वार शिलेदार पागा वगैरे याचे रहदारीच्या उपसर्गामुळें प्रजा परागंदा जाली याकरितां त्यासहि ताकीद पत्रें सादर जाहले आहेत तुम्हीं होबासा सांगावी येऊन राहणें कोणेविसी उपसर्ग लागणार नाहीं जाणिजे छ २ जिल्काद मोर्तब सुद

मोर्तब
सुद

त्रिंबक सूर्याजीची कर्तबगारी पाहून श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांनीं आपल्या अधिकारांत मौजे साकोरे पो माणिकपुंज हा गांव इनाम दिला होता हें पूर्वीं दिलेंच आहे. पण पुढें श्रीमंतांच्या सत्तेचा जोर कमी पडल्याबरोबर तेथील अधिकारी चिंतामण हरि त्रिंबक सूर्याजीस उपद्रव देऊं लागला. ह्या त्याच्या खोडसाळपणाबद्दल, त्रिंबक सूर्याजीनें श्रीमंत रघुनाथरावांकडे तक्रार केली. पण यावेळीं ते पेशवाईच्या गादीवर नसल्यामुळें, चिंतामण हरीस शासन करणें त्यांस शक्य नव्हतें. म्हणून त्यांनीं याबद्दल आपल्या पुतण्यांस पत्र लिहिलें. तें असें:–– "मौजे साकोरे पो माणिकपुंज हा गांव राजश्री त्रिंबक सूर्याजी याजकडे आहे. तो त्याजकडे चालवावा येविसीचा करार साल मजकुरी सु॥ समान सीतैनांत जालाच आहे तर आपलेजवळ म॥निलेचे गांवाविशीं कोण्ही घालमेल करील तर त्याचे न ऐकावे म॥निलेकडेच सुदामत चालत आल्याप्रमाणें सुरक्षित चालते करावें. राजश्री चिंतामण हरि मौजे मजकुरीस उपद्रव करितात त्यास ताकीद करावी र॥ छ २४ जमादिलाखर"[१] (ख्. १२ ले. ८४)

इ. सन १७७० मध्यें श्रीमंत माधवराव पेशव्यांस हैदर नायकावर तिसरी स्वारी करण्याचा प्रसंग आला. ह्याचें कारण असें होतें कीं, हैदर नायकानें दुसऱ्या स्वारीच्या वेळीं जो पेशव्यांबरोबर तह केला होता तो धाब्यावर बसवून पुन: कर्नाटकांतील पेशवे अंकित जो प्रांत होता त्या प्रांतांत तो लूटमार करूं लागला; इतकेंच नव्हें तर पेशव्यांचे नोकर त्या प्रांतांच्या संरक्षणार्थ ठेविले होते, त्या कित्येकांस त्यानें कैद केलें तर कित्येकांना तेथून पळवून लाविलें. गांव लुटून तो प्रजेस हैराण करूं लागला. त्या त्याच्या कृत्याचा पेशव्यांस संताप आला. तेव्हां त्यास पेशव्यानीं नेस्तनाबूत करण्याचें ठरविलें. आणि जंगी स्वारीची तयारी चालविली. पुण्यांत तोफा ओतण्याचा कारखाना काढिला. गारदी व युरोपीयन गोलंदाज नवीन चाकरींत ठेविले. बेदनूरच्या झाडीच्या आश्रयानें हैदर पेशव्यांच्या सैन्यास फार सतावीत असे, हें जाणून रानतोड्या लोकांच्या जमाती पेशवे यांनीं चाकरीस ठेविल्या. खेरीज आपल्या

---

१ शके १६८९ कार्तिक वद्य ११ ता. १७ नोव्हेंबर १६६७ इ. य. रा. गुप्ते.

सर्व सरदारांस ह्या स्वारीस येण्यास हुकूम फर्माविले. ह्या स्वारीचें आधिपत्य आपणांकडे घेऊन, सर सेनापति कर्नाटकांत वापरलेल्या बुढ्या गोपाळराव पटवर्धनास न करितां त्रिंबकराव मामा पेठे या तरुणास केला; आणि त्याचा दुय्यम गोपाळराव पटवर्धनास नेमिला. या स्वारीबरोबर येण्यास त्रिंबक सूर्याजीस हुकूम झाला होता.

त्रिंबक सूर्याजी हा वेळपर्यंत उत्तरेंत पेशव्यांच्या मुलखाचा बंदोबस्त करून होता. जरी त्याची नेमणूक सरदारांत होती, तरी त्याजवळ कायमची फौज नव्हती; वेळ पडेल तेव्हां तात्पुरती फौज ठेवावयाची. कायम फौज ज्याच्याजवळ असे, त्यास त्याच्या फौजेच्या खर्चाप्रमाणें पेशव्यांकडून, नेमणूक अगर इनाम गांव असत. पण त्रिंबक सूर्याजीसारख्या सरदारास स्वारींत घेतलें कीं, त्याचा लायक जामीन घेत असत. जामीन पटल्यानंतर त्याजबरोबर करार होत असे. ह्याचें कारण असें कीं, स्वारींत लूट मिळाल्यास अगर गड किल्ला हल्ला करून ताब्यांत घेतल्यास, ते सर्व आपल्या यजमानांच्या स्वाधीन करावयाचें; नाहीं तर असा एखादा सरदार निघावयाचा कीं, त्यानें मिळविलेली लूट व गड किल्ले आपण जिंकून अगर हल्ला करून घेतले, कीं ते आपलेच म्हणून तो त्याचा मालक होऊन बसेल व यजमानास पुढें तो एक शत्रूच होईल. असें होऊं नये म्हणून त्याचा जामीन पटवीत आणि मग करार करीत. त्या करारांत त्यास फौज फाटा ठेऊन त्याच्या खर्चाची हमी व कोणत्या बाजूनें कोणाबरोबर जावयाचें वगैरे ठरत असे. त्याप्रमाणें त्रिंबक सूर्याजीबरोबर करार झाला. या स्वारीपुरता भगवंतराव बापुजी जामीन राहिला या नांवाच्या गृहस्थाचें ता. १९-११-१७७० चें पत्र पुढीलप्रमाणें आहे:—

राजश्री त्रिंबक सूर्याजी यांस स्वामीनीं सोन्दे प्रांत वगैरे किल्लेदार हैदर नाईक यांजकडील घ्यावयास रवानगी केली आणि मा॥निलेस आपण जामीन असो किले कोट घेऊन सरकारांत न देत बदमासी करतील तर आपण हजर करून देऊं छ १ शाबान सु॥ इहिदे सबैन मया व अलफ (पे. द. ३७ प. २१८)

वरीलप्रमाणें त्रिंबक सूर्याजीच्या जामिनाचें पत्र पेशव्यांकडे गेल्यावर

त्रिंबक सूर्याजीस हैदर नायकाच्या पश्चिमेकडील सोंदे प्रांतावर स्वारी करण्याचा हुकुम ता. २१-११-१७७० चा खुलासेवार आला तो "यादी निसबत राजश्री त्रिंबक सूर्याजी सु॥ इहिदे सबैन मया व अलफ स्वामीनी आज्ञा केली कीं, तुम्हीं या मागें कामेंकाजें केलीं ती देखिली नाहीं. हाली रुबेरू करून दाखविणें म्हणून आज्ञा जाली. आज्ञा ते शिरसावंद्य सेवकाची चाकरी मेहनत खावंदाचा पुण्य प्रताप यश आहे. तरी कृपाळू होऊन सेवकास सनदा द्याव्या. सवंदे प्रांताची निमा वरघाट अहद सामराणी तहद बांधारी कोंकणपटी किल्ले मर्दन गडापासून गोकर्ण महाबळेश्वर होनापर्यंत किल्ले व ठाणी व मुलूख यांच्या सनदा द्याव्या स्वामीच्या पुण्यप्रतापें सदरहू प्रांतांत सरकारचा अमल होईल त्यासी कर्जवाम करून मसलत सुरू केली पाहिजे. यासी येथास्थित सरकारचा अमल जाल्यानीं दरम्यान कोणी रसद घ्यावयास सिद्ध होतील ते न व्हावे. किल्ले व प्रांत सेवक श्रम साहस करून सोडवितो तो तालुका सेवकाचे ताबियांत असावा. जो कोणी साहेब कामावर उभा राहील श्रमसहास करील त्यांस सेवक वचन देईल. धंदे रोजगार व बक्षिसें वगैरे देऊन मसलत पुरी करून कार्य सिधि जाहलीया स्वामीनीं सेवकाचे वचन पार पाडणार स्वामी धनी समर्थ आहेत. भाऊबंद, पत्र, पुतणे व सरदार कारकून सुधा मसलतीस जातो. मसलत सिधीस गेल्यानंतर सर्वत्रांचे चालविणार खावंद समर्थ आहेत.

सदर्हूपैकीं कलमे संबंधे वरघांटे अहद साम्राणी बांधारी कोंकणपटी किले मर्दन गड यापासून गोकर्ण महाबळेश्वर होनावरपर्यंत किले व ठाणी मुलूक जो हैदरखान याचा मुलूक असेल त्यांत स्वारी सिकारी करून किले व मुलूक काबीज करावा मसलतीस खर्च होईल सरकारचा व हैदरखानचा बिघाड आहे तों पो सदरहु मुलूकावर फेडावा. सरकारांत मागो नये. क. १

सदरहू मुलूकपैकीं किलेजात व जमीदोज ठाणी सुटतील व तालुका सुटेल या पैकीं किले व जमिदोज ठाणीयांत माणसें घालून बंदोबस्त राखावा ठाणीं किले व तालूका सरकारांत द्यावा. कलम १

हैदरखानाचा सलूख जाहलाच तहांत सदरहू किले जात वगैरे व तालुका सोडणे जाहल्यास सोडावा लागेल. कदाचि (त) सलुख होऊन तालुका व किले सरकारांत राहिले

श्रमसाहस करून तुम्हीं मसलत सरकार नक्ष राखून शेवटास नेण्यास तुमचे स्वरुपानसार ऊर्जित केले जाईल.

कलम १

तर किलेखेरीज करून तालुका तुम्हांकडे कमाविशीनें ठेविला जाईल. कलम १

आम्हांस समागमें मसलतीस कित्येक लोक चाकर व कुमकी मिळतील त्यास कांहीं बक्षिस द्यावे म्हणोन. त्यास तुम्हीं मनस्वी वचनें कोणास न देणें. सरकारांतू (न) चाकरी पाहून कार्याकारण रद-बदली आइकिली जाईल.

कलम १

सदरहुप्रमाणें पांच कलमें लिहिल्याप्रमाणें म॥निलेचे नांवे सनद देणें छ ३ शाबान इहिदे सबैन मार्गसीर्ष सनद लिहिणें. ॥ (पे.द. ३७ प.२१८)

वरील पांचकलमी यादींत त्रिंबक सूर्याजीनें कसें वर्तन करावें हें नमूद केलें आहे. श्रीमंत माधवराव पेशव्यानीं त्याचा पराक्रम अगर कार्यदक्षता प्रत्यक्ष अनुभवलेली नव्हती; तरी या स्वारींत पराक्रम करून यशस्वी होऊन आल्यावर योग्य पारितोषक दिलें जाईल, म्हणून त्यांनीं हमी दिली. तसेंच जादा मनुष्य ठेऊन कर्जवाम करून स्वारीचें काम फत्ते करावें. स्वारी यशस्वी होण्याकरितां, आपला मुलगा, पुतण्या, भाऊबंद, वगैरे यांची मदत घ्यावी असें सांगण्यांत आलें. त्यांसहि योग्य पारितोषक देण्याचें आश्वासन देण्यांत आले. मुलूख, गड किल्ले फितुर करून घेण्यास खर्च झाल्यास करावयाचा होता. स्वारी चालू आहे, तोंपर्यंत खर्च तेथील उत्पन्नांतून करण्याची मुभा दिली होती. तसेंच त्रिंबक सूर्याजीनें कोणत्या मुलखांवर जाऊन हल्ला करावा त्याची हद्दहि ठरवून दिली होती.

त्रिंबक सूर्याजीस सोंदे प्रांतावर खुषकीनें जाण्याची पेशव्यांची आज्ञा होती व जलमार्गानें वाडीच्या सावंतासहि त्याच्या मदतीस जाण्यास सांगितलें होतें. त्यासंबंधीं ता. १२-१२-१७७० चें पत्र आहे तें " बिदनूर प्रांतें

सरकारचें अरमार रवाना केलें आहे आणि सांवतासहि त्या प्रांतीं धामधूम करावयासी सांगितली आहे. तेहि सुन्दे प्रांतीं जमा होत चालले आहेत. त्रिंबक सूर्याजीहि सोंदें बिदनूर प्रांते खुष्कीकडून रवाना केले आहेत. तेहि लौकरच जाऊन पोंचतील त्यास जसे बनेल तसे करून ज्यांत शत्रूचें पारिपत्य तें करावें." ( ऐ. ले. सं. प. १०६५ )

त्रिंबक सूर्याजीचा या स्वारीपुरता जामीन पटून पेशव्यांच्या कराराच्या यादी प्रमाणें, त्यानें नवीन फौज ठेवण्यास सुरवात केली. तो शूर होता, मुत्सदी होता. गनिमीकाव्याची लढाई खेळण्यांत तो पटाईत होता. कोणत्या स्वारींत कोणत्या जातीच्या लोकांचा भरणा केला असतां आपणास यश येईल याचा प्रथम विचार करूनच तो सैन्यांत भरती करत असे. त्याच प्रमाणें ह्या सोंद्याच्या स्वारीवर जातांना त्यानें मावळयांची पलटण आपल्या नोकरींत ठेविली. मावळे लोक मूळचे काटक. चिकाटीनें लढणारे. आणि आपल्या धन्याच्या हुकुमांत सदैव वागणारे असत. छत्रपति शिवाजी महाराजांस स्वराज्याचें निशाण उभारण्यास प्रथम मावळ्यांचेंच साह्य होतें. आबाजी विश्वनाथाच्या पथकांत राहून छत्रपति संभाजी महाराजांच्या वधानंतर मावळ प्रांतांत औरंगजेबास तोबा तोबा करण्यास लावणारे हे मावळे वीरच. ते कधींहि आपल्या धन्याचा विश्वासघात करीत नसत, पेशव्यांचा अंमल महाराष्ट्रांत चालू झाल्यानंतर मावळ्यांच्या पलटणी बंद करून त्यांच्या ऐवजीं, गारदी, आरब वगैरेंच्या पलटणी उभारल्या गेल्या. हे परस्थ लढवय्ये, शिरजोर होत जाऊन राज्यनाशास कारणीभूत झाले. पेशव्यांच्या हुकुमाप्रमाणें त्रिंबक सूर्याजी आपल्या बरोबर मावळी पलटण घेऊन खुष्कीच्या मार्गानें सोंद्यावर हल्ला करण्यास निघाला. जलमार्गानें वाडीकर सावंत व पेशव्यांचे आरमारहि निघालें. त्रिंबक सूर्याजीनें जाऊन पहिल्या घडाक्यांस निकराचा हल्ला चढवून होनावर, मलबार किनारा व त्यालगतचीं बंदरें आपल्या ताब्यांत घेतलीं. हा हल्ला अगदीं अचानक होता. तसेंच किनाऱ्यावर सावंताचें आरमार उभें होतें. खुष्कीवरून त्रिंबक सूर्याजीच्या मावळ्या पलटणीचा निकराचा हल्ला झाला. त्यामुळें हैदर नायकांच्या लोकांस स्वसंरक्षणाचीहि संधि मिळाली नाहीं. अशा स्थितींत तेथील लोक त्रिंबक सूर्याजीच्या ताब्यांत आलें. पहिल्याच हल्ल्यांत त्यांस यश आलें.

त्यानें पश्चिम किनाऱ्यावरील हैदर नायकांची मुख्य बंदरें आपल्या ताब्यांत घेतलीं, मावळें लोकांच्या पायदळाचा त्रिंबक सूर्याजी या नांवाचा एक सरदार व वाडीकर सावंत यांनीं सोंध्यावर स्वारी केली. अरमारानें जाऊन होनावर व मलबार किनाऱ्याची कित्येक बंदरें घेतलीं." ( ऐ. ले. सं. ४-१६६८ )

हैदर नायकाचा पश्चिम किनारा त्रिंबक सूर्याजीनें व सावंतानें जबरदस्त बंदोबस्तानें आडविला, तर इतर पेशव्यांच्या सरदारांनीं खषकीवरून निरनिराळ्या ठिकाणांवरून निकराचे हल्ले चढविले. त्यामुळें हैदराची त्रेधा उडाली. त्यांस शरण जाण्याखेरीज दुसरा मार्गच शिल्लक उरला नाहीं. म्हणून त्यानें थो. माधवरावांकडे तहाची याचना केली. त्यावेळीं ते आपल्या शेवटच्या आजारानें अगदीं त्रस्त झालेले होते. म्हणून त्यानीं हैदराशीं विशेष अटी न घालता तह केला.

त्रिंबक सूर्याजीची नेमणूक पेशव्यानें सोंद्यावर केली. त्यावेळीं पांचकलमी यादी दिली, ती वर दिलीच आहे. त्या यादींत म्हटलें आहे कीं. " तुम्हीं या मार्गें कामेंकाजें केलीं तीं देखीलीं नाहींत हली रुबरू करून दाखविणें म्हणून आज्ञा जाहली वगैरे" त्याप्रमाणें ही स्वारी ऐन रंगात येऊन त्रिंबक सूर्याजी आपला पराक्रम पेशव्यांच्या नजरेस आणून महाराष्ट्राच्या इतिहासांत नमूद करून ठेवण्याच्या ऐन प्रसंगीच त्याच्या दुर्दैवानें तह झाला. नंतर ज्यांनीं त्यांनीं आपापलीं सैन्यें परत नेण्याच्या ठरावाप्रमाणें स्वारीचें काम बंद करून आपल्या प्रांतीं निघून जावें म्हणून हुकूम फर्माविण्यांत आले; त्याप्रमाणें त्रिंबक सूर्याजीसहि स्वारीचें काम बंद करून ताब्यांत घेतलेला प्रांत मोकळा करून परत फिरण्याचा हुकूम झाला. तो परत आला. थो. माधवराव पेशव्यांच्या नजरेस त्याचा पराक्रम आला असला पाहिजे. पण त्याचा त्यास कांहींच लाभ झाला नाहीं. कारण क्षयरोगाच्या तिसऱ्या पायरीवर; ते असल्यामुळें त्यांस कोणेत्याहि सरदाराच्या कृत्याबद्दल कांहींच करिता येणें शक्य नव्हतें. त्रिंबक सूर्याजीस मिळणारें बक्षीस तर गेलेंच. पण या स्वारींत त्यास सर्वस्वास मुकावें लागलें. याचें कारण असें कीं, या स्वारीवर जातांना पराक्रम केल्यास बक्षीस किंवा योग्य सन्मान केला जाईल हें वचन होतें. तें उपयोगी पडलें नाहीं. दुसरें वचन " स्वामीच्या पुण्यप्रतापें सदरहू प्रांत सरकारचा

अंमल होईल त्यास कर्ज वाम करून मसलत सुरू केली पाहिजे" असेंहि होतें. त्याचाहि कांहीं फायदा झाला नाहीं; कारण ह्याच आजारानें पेशवे सन १७७२ च्या नोव्हेंबर महिन्यांत दिवंगत झाले. पहिल्या वचनाची क्षिति त्रिंबक सूर्याजीस भासली नाहीं. पण दुसऱ्या वचनामुळें मात्र तो सर्वस्वास मुकला हें निराळें सांगावयास नकोच; कारण पेशव्यांस आपला पराक्रम त्यास दाखवावयाचा होता. या हिरीरिनें तो ह्या स्वारीवर गेला तो स्वतःच्या खर्चानें. त्यास सैन्याच्या व त्याच्या खर्चास द्रव्य मिळालें नाहीं. कारण वरील पांच कलमी यादींत, त्रिंबक सूर्याजीस खर्चास दिलेल्या रकमेची नोंद नाहीं. पेशव्यांच्या वचनाप्रमाणें त्यानें सावकारांकडून कर्ज काढून या स्वारीचें काम चालविलें होते. स्वारीतून परत आल्यानंतर प्रत्येक सरदारानें सावकाराची घेतलेली रक्कम व्याजबट्ट्यासह परत करावयाची रीत होती, तद्वत सैन्याचा पगार व जी काय देणगी द्यावयाची याचाहि निकाल परत मुक्कामीं आल्यावर त्वरित करावयाचा असे. त्रिंबक सूर्याजीस स्वारींत लुटीचें द्रव्य मिळालें नव्हतें. थोरले माधवराव शेवटल्या पंथास लागले होते व नंतर दिवंगत झाले. त्यामुळें याचें बक्षिस तर दिवंगत झालेंच. पण स्वारीच्या खर्चासहि त्यास मुकावें लागलें. त्रिंबक सूर्याजीस स्वतः इतकी रक्कम भरण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्यामुळें सावकार त्याच्या घरीं धरणें धरून बसले व सैन्यांतील बेकार लोक आपल्या तनख्याकरितां दंगे धोपे करूं लागले. जी कांहीं थोडी मिळकत होती, ती सावकारांनीं जप्त केली. त्यामुळें त्रिंबक सूर्याजीच्या मुलांमाणसांस खाण्याची सुद्धां अडचण पडूं लागली. सैन्यांतील लोकांनीं त्यास मारण्याचा व खून करण्याचाहि धाक दपडशा दिला. तेव्हां अब्रूसाठीं त्रिंबक सूर्याजी एकाएकीं परागंदा झाला. तेव्हां त्याची बायका-मुलें घाबरून गेलीं. वास्तविक पाहता पेशव्यांच्या दरबारी मंडळीकडून ह्याचा विचार व्हावयास पाहिजे होता. पण तो कोणीहि केला नाहीं. त्रिंबक सूर्याजी मोठ्या हिरिरीनें सोंद्याच्या स्वारीवर पराक्रम गाजवून दोन पैसे कमावून आणू अशा उद्देशानें गेला होता. पण तो दिवाळखोर बनला. आणि अब्रु करितां व माराच्या भीतीनें परागंदा झाला. ही कमाई या स्वारीवर त्यानें केली! अखेर नाइलाजास्तव त्रिंबक सूर्याजीचा वडील मुलगा रावजी त्रिंबक यानें श्रीमंत नारायणराव पेशव्यांकडे आपल्या वडिलांची वरील सर्व हकीकत

निवेदन केली व आपली दाद सरकारांतून लागावी अशी विनंती केली. त्यांचें उत्तर आलें तें खालीं दिल्याप्रमाणें:-

श्री.

गुरवार जेष्ट शु. ११ शके १६९४
[ ता. ११ जून १७७२ ]

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री त्रिंबक सूर्याजी यासीः-

स्ने ॥ नारायणराव बल्लाळ प्रधान आसिर्वाद. सु ॥ सला सबैन मया व अलफ, तुमचे पुत्र रावजी त्रिंबक याणी हुजूर येऊन विदित केलें कीं त्रिंबक सूर्याजी यास सरकारांतून सोंधे प्रांते सोडवावयाची आज्ञा केली त्याजवरून स्वार पायदळ वगैरे लोक चाकर ठेऊन सोंधे प्रांती गेले. एक दोन वर्णी घेतली तों सरकारचे फौजेचा तह झाला. मसलत सोडून येणें म्हणून आज्ञापत्र सादर झाले. त्यांस लोंकांची सिबंदीस कर्जवाम करून पैका दिला. तो अंगावर पडला कर्जदार जालो. रोज धरणी होऊं लागली यास्तव परागंदा जालों. तरी कर्जदारांस ताकीद व अभयपत्र सादर जालीयास घरास येऊं म्हणोन विनंति केली. ऐसीयास तुमची मसलत फसली कर्जदार जालों. सावकाराचा तगादा तुम्हांस सक्त होतो. हें जाणून कर्जदारांस ताकीद व तुम्हांस अभय पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं कोणेविसी शंका अंदेशा न धरता आपले घरीं येऊन सुखरूप राहणें तुम्हांस कर्जदारांचा तगादा लागणार नाहीं. जाणिजे. छ ९ आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा

श्रीमंत नारायणराव पेशव्यांचे वरील अभयपत्र त्रिंबक सूर्याजीस आलें. त्या नंतर दोन दिवसांनीं त्यांनी शिबंदी, सिलेदार, वगैरे नोकर ठेविले होते त्यांस व ज्यांचा पैशाचा तगादा त्रिंबक सूर्याजीकडे सारखा लागला होता त्या सर्वांस पेशव्यांकडून ताकीद पत्र आलें तें खालीं दिल्या प्रमाणें:-

श्री

राजाराम नरपति
हर्ष निधान नारायणराव
बल्लाळ मुख्य प्रधान

शनिवार जेष्ट शु. १३
शके १६९४
[ता. १३ जून १७७२]

राजश्री सावकार कर्जदार व सिबंदी किलेदार व सिलेदार व जकातदार व भाडेकरी व भोंई वगैरे नि ।। त्रिंबक सूर्याजी यास नारायण बल्लाळ प्रधान सु ।। सला सबैन मया व अलफ. रावजी त्रिंबक याणी हुजूर विदित केले कीं, सरकारांतून त्रिंबक सूर्याजी यास सोंधे प्रांत तालुके सोडवावयाची आज्ञा जाली त्यावरून साऊकाराचें कर्ज वाम घेतले लोक स्वार वगैरे ठेविले. तालुके मजकुर जाऊन एक दोन वर्षे घेतली. पुढें प्रांत सोडवावयाचा तों हैदर नाईक याचा व सरकारचा सलुखा जाला. हुजूरहून ताकीद पत्रे सादर जाली कीं मसलत सोडून येणे त्यावरून मसलत सोडून आलो. कर्जदार जालो. कर्जदार सिबंदीवाले वगैरे याणी प्राणाची गांठ घातली. तेव्हां परागंदा जालो. कर्जदार सिबंदीवाले व सावकारांनीं कर्ज व सिबंदीचा पैका वगैरे न मागणे असे पत्र सादर जालीया बचाव होईल म्हणून विनंति केली ऐसीयासी त्रिंबक सूर्याजी याणी मसलत केली ती फसली. सिबंदी काढली कर्जहि जाहले दिवाळे निघाले. द्यावयास अवसर नाहीं हें जाणून म ।। निलेस कौल सादर केले असे. ते हुजूर येतील धंदा रोजगार लागेल तेव्हां मिळकत सावकाराचा मात्र पैका देतील. तोपर्यंत तुम्हीं त्रिंबक सूर्याजीस तगादा न करणे बोभाटा हुजर येऊं न देणें. बोभाटा आलियास परिछिन्न कार्यास येणार

नाहीं. हें समजून वर्तणूक करणें जाणीजे छ ९ रबिलावल आज्ञा प्रमाण

लेखन
सीमा

श्रीमंत नारायणराव पेशवे गादीवर विराजमान झाल्यापासून सरदारांस स्वारीचें काम पडलेंच नाहीं. त्यांची कारकीर्द म्हणजे गृहकलहांत ( चुलता चुलतीच्या कलहांत ) आणि खुद्द राजधानीचें शहरांत जातिमत्सराचा अग्नी पेटलेला. त्या भडकलेल्या मत्सराचा वेताळ चांद्रसेनीय कायस्थ प्रभु जातीच्या मानगुटीवर बसला. ह्याचें कारण काय तर तींतील पुरुषजात ब्राम्हणाप्रमाणें स्नान संध्या व नित्यकर्मे करी ते व वेदोक्त कर्मेंहि आपल्या घरीं करी ते ती ब्राम्हणांस घरीं बोलावून करीत. त्यास आळा बसून त्या ज्ञातीस शूद्र ठरवावें अशा भावना अनेक वर्षे कांहीं मत्सरी लोकांच्या हृदयांत मूळ धरून राहिल्या होत्या. पण राजाश्रयाचा त्यांस पाठिंबा मिळाला नव्हता, तोंपर्यंत त्या तशाच दाबून ठेवाव्या लागल्या. त्यांस ह्यावेळीं पाठिंबा मिळतांच जोर चढला.

ह्या त्यांच्या दंडेलीचा स्पष्ट व एकच अर्थ म्हणजे चां. का. प्रभूनां शक्य त्या मार्गांनीं छळणें हाच होता. त्यांचे संस्कार व नित्यनैमित्यिकें हें चां. का. प्रभूंचें एक वैशिष्ट्य असून त्यांच्या पूर्तीसाठीं होमहवन विधि होणें आवश्यकच ठरतें. ह्या आडमुठ्या दंग्यानें चां. का. प्रभूचे धार्मिक संस्कार, रूढि परंपरा व नित्य कर्मे ह्यावर भयंकर घालाच घातला जात होता. यावेळीं कांहीं द्वेष्टे इतके शिरजोर झाले होते कीं, समता व विश्वबंधुत्व हें त्यांच्यांतून पार नष्ट झालें होतें. त्यांच्या उच्छृंखल वृत्तीस पेशवे सरकारांतून फूस पूर्वी मिळत नव्हती. पण श्रीमंत नारायणरावांनींच यावेळीं पुढाकार घेतला, हें तत्कालिन खऱ्या इतिहासाचें संशोधन करणाऱ्यास दृष्टिआड करून चालणार नाहीं. कै. ग्या. सनडेकृत ग्रंथमालेंत पुढीलप्रमाणें मजकूर दिला आहे.

"हा जातिमत्सर व पोट जातिमत्सर याचा पहिल्या अर्धांत मुळींच गंध नव्हता. दुसऱ्या अर्धांत जातिमत्सराचा इतका बडेजाव माजला कीं, एकजूट होणें अशक्य झालें व राष्ट्राच्या हिताच्या ऐवजी आपलीच तुंबडी भरण्याकडे प्रत्येक सरदाराचें लक्ष गुंतलें. यावेळीं ब्राह्मण मंडळी म्हणजे अगदीं तर्र झालेली. खरे राज्यकर्तें आपण, आपणांस इतर जातीपेक्षां विशिष्ट हक्क व सवलती पाहिजेत असें ते समजत असत." हा दंगा अगदीं निरर्थक होता. आणि आपणांबरोबर जर कोणी शिरजोरपणानें वागतील तर आपले सत्य व न्याय हक्क पूर्वापार आहेत ते कायम ठेऊं अशी चां. का. प्रभूंस आजपर्यंतच्या निवाड्यावरून धमक होती. पण राज्यकर्त्यांनेंच जर सत्य व न्यायाचें गांठोडें वेशीवर बांधून ठेविलें, तर न्याय कसा मिळणार ! त्यामुळें वादाचा निकाल विरुद्ध झाला यांत नवल तें काय? या संबंधीं पुढील उतारा विचार करण्यासारखा आहेः— "प्रत्येक जातीनें हिंदुधर्म शास्त्रतः आधार सांपडतील त्या सर्वांवर हुकूम स्वतःला अधिकार मागावे व घ्यावे. कोणत्या जातीला किती धार्मिक हक्क असावेत हा प्रश्न वेदोक्ताच्या वादांत नाहीं. तर एखादा विशिष्ट जातीचा राजा असता त्यानें आपल्या जातभाईच्या अभिमानाला बळी पडून पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक किंवा सामाजिक पद्धतींत किती हात घालावा एवढाच प्रश्न आहे. शिवाजी महाराजांच्या वेळीं झालेला निर्णय आजच्या राजानीं कां मान्य करूं नये? याचें उत्तर कोणी देत नाहीं. कोणाला वेदोक्त संस्कार करावयाचा असेल तो त्यानें खुशाल करावा. पण त्याकरितां खाजगी इनामें जप्त करूं नयेत. देवस्थानाच्या वहिवाटीस हात घालूं नये. राज्याच्या ताब्यांत अनेक जातीची प्रजा असते. त्या सर्वांशीं राजानें ममतेनें वागलें पाहिजे + + पण त्याकरितां दुसऱ्या ज्ञातीवर, जुलूम करूं नये, किंवा शेंकडों वर्षें चालत असलेल्या धार्मिक संस्थांत ( कृत्यांत ) राज्याधिकाराच्या जोरावर ढवळाढवळ करूं नये." ( टि. च. भा. २–११ )

विसाव्या शतकांत या वादाचें कारणच उरलें नाहीं; कारण आतां स्नान संध्यादि नित्य कर्मांची जरूरी भासत नाहीं व त्याची कोणासहि किंमत उरली नाहीं. पण धुमसत राहिलेला अग्नि, नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत

चाव मिळतांच भडकला तो त्यांच्या अधिराज्यांत कित्येक वर्षे पेट घेतच होता. याची साक्ष महाराष्ट्राच्या इतिहासाचा शेवटचा भाग देत आहेच.

चां. का. प्रभु आपली धार्मिक नित्यकर्मे करीत व तीं पूर्वापार करीत होतेच. तो कांहीं राजद्रोह नव्हता किंवा त्यांत पेशवाई उलथून पाडण्याचा कट नव्हता. ही जी दंडेली माजवून दंगा आरंभण्यांत आला याचें कारण कोणतें ? आपलीं धार्मिक कृत्यें पूर्वापार करण्याचा जो चां. का. प्र. चा. हक्क होता त्याचप्रमाणें ते करीत होते. तसें करण्यांस त्यांस पूर्ण हक्क होता. त्यांस खुद्द राजकर्त्यांसहि बंद करण्याचा हक्क नव्हता; हें वरील टिळक चरित्रां-तील उताऱ्यावरून सिद्ध होतें.

चां. का. प्रभूंनीं हा मोटा गुन्हा अगर राजद्रोहच केला असें गृहित धरून एकदम त्या जातींतील कांहीं प्रमुख गृहस्थांवर पकडवारंटें काढण्यांत आलीं. चां. का. प्र. नीं. त्यावेळीं ' दिधलें दुःख परानें । उसनें फेडूं नयेच सोसावें ' असा नामर्दपणा केला नाहीं ही सुदैवाचीच गोष्ट होय ! या संबंधीं पुढील उतारा मनन करण्यासारखा आहे:– " स्वतः दंग्यास प्रवृत्त होणें आणि अंगावर आलेली घोरपड टाळण्याकरितां मारामारीस तयार होणें किंवा लोकांच्या अंगावर चालून जाणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. आमचा जुना शास्त्रार्थ म्हटला म्हणजे,

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राम्हणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन् ॥

असा आहे. म्हणजे आपले अंगावर चालून आलेला मनुष्य कोणीहि असो, विद्वान ब्राह्मण असो अगर बाप असो त्यास बेलाशक चोपावा " ( केसरी २२–८–९३ ) बहुश्रुत ब्राम्हण अंगावर चालून आल्यावर चां. का. प्रभूंनी काय करावें हें वरील मनुवचनावरून कैमुतिक न्यायानें सिद्ध केलेंच आहे.

पण याचा परिणाम चांगला न होतां वर दिल्याप्रमाणें पकड वारंटें निघून या ज्ञातींतील निवडक सोळा जणांस पकडून नेलें ते:– १ रामराव

६६२८

जिवाजी, २ विठ्ठल यशवंत,[१] ३ रामजी मल्हार, ४ मुरार दौलत,[२] ५ बाजीराव साबाजी, ६ सोयरो वामन, ७ बचाजी खंडेराव, ८ अप्पाजी भिकाजी, ९ खंडेराव बापूजी. १० त्रिंबक महिपतराव,[३] ११ बळवंतराव शंकर, १२ सखाराम हरि,[४] १३ निळकंठ रामचंद्र,[५] १४ नारायणराव हरि, १५ बाळाजी गणेश, आणि १६ त्रिंबक सूर्याजी ( चरित्र नायक ). हे होत ! यांस पकडून नेण्यास कारण काय ! तर ते आपल्या घरीं धार्मिक कृत्यें करितात, तीं करूं नको म्हणत असतांहि शास्त्रोक्त होम हवन करितात, आणि त्या कृतीचा विध्वंस करीत असतां करूं न देतां त्यांस प्रतिबंध करितात हा भयंकर गुन्हा. म्हणून त्यांस, बिनाचौकशी बदमाशांप्रमाणें कैद करून ठेविलें. वास्तविक त्यांच्या कृत्यांत राजद्रोह नव्हता, किंवा पेशवाई उलथून पाडण्याचा तो कट नव्हता. तशांत चां. का. प्रभुनीं स्वराज्याच्या प्रारंभापासून रणांगणावर आपलें अस्सल नाणें वाजवून दाखवून समानता सिद्ध करून दाखविली होती. आपल्या रक्ताचें सडे सांडले होते. पेशव्यांच्या अमदानींत ते स्वराज्याकरितां इमानें इतबारें झटले व त्याकरितां कित्येकांनीं आपले देहहि अर्पण केले. पुढेंहि कित्येक निष्ठेनें वागले. त्यापैकीं त्रिंबक सूर्याजी हा एक होता.

इतकेंहि करून चां. का. प्रभु नामोहरम होत नाहींत तेव्हां त्यांच्याकडून तत्कालीन कांहीं मुत्सद्दी व खूपशर्तीनें मराठी राज्यरक्षण करण्याचा चंग बांधणारांनीं आपल्या सुपीक मेंदूतून एक नवकलमी कतबा अगर एक दस्ता ऐवज लिहून काढून, त्याजवर सही करील त्यास बिनशर्त कैदेंतून मुक्त करावयाचें असें ठरविलें. तो कतबा वाचून पाहून कैदेंतील लोकांनी ठरविलें, कीं याजवर सह्या केल्यास आपलें तूर्त कांहीं बिनसत नाहीं. तेव्हां कैदेंत अन्नपाण्यांवाचून उपाशी मरण्यांपेक्षां सह्या करून कैदेंतून मुक्त झाल्यानंतर बळजबरीनें घेतलेल्या सह्यांच्या यादीचा विचार करितां येईल. सबब त्या कदब्यावर अगर यादीवर त्यांनीं निरुपायानें सह्या केल्या. तो कदबा खालीं दिल्या प्रमाणें:—

---

१ पोतनीस. २ नारकर. ३ चिटणीस. ४ सरदार गुप्ते. ५ पागे. स. रा. गुप्ते.

१ वैदिकमंत्रें करून कांहींच कर्म करणार नाहीं.

२ वैदिकमंत्र येत असतील त्यांचा उच्चार करणार नाहीं.

३ माताचे पिंड करणार नाहीं.

४ देवपूजादिक विहितकर्में पुराणोक्त मंत्र म्हणूनच करूं व ब्राम्हण भोजन आपलें घरीं करणार नाहीं.

५ शालिग्राम पूजा करणार नाहीं

६ ज्या देवास शूद्र जातात त्या देवास जाऊं.

७ ब्राम्हणांना दंडवत मोठ्यानें म्हणत जाऊं व आपले जातींतहि दंडवत म्हणत जाऊं.

८ वैदिक ब्राह्मण व आचारी व पाणके व शागिर्द ब्राह्मण बायका चाकरीला ठेवणार नाहीं व आपलें घरींहि ठेवणार नाहीं.

९ आमच्या जातीमध्यें संतोषें पाट लावतील त्यांना आम्हीं अडथळा करणार नाहीं.

वरील कर्तव्याची चां. का. प्रभू समाजांनीं कांहींच किंमत केली नाहीं. पण तो लिहून घेणारांस तो एक अपूर्व दस्त ऐवज मिळालेसें वाटलें. त्यांनीं स्वतःच धन्यता मानून घेतली. पण तशाहि परिस्थितींत कायस्थ प्रभूनी आपली धार्मिक कृत्यें करण्याचीं बंद केलीं नाहींत. हा वाद सुमारें पंचवीस वर्षें अव्यहात चालूंच होता. हें कै. वासुदेवशास्त्री खरे यांच्या लेखावरून सिद्ध होतें. हा काळ म्हटला म्हणजे, श्री. नारायणराव पेशव्यांचे आऊट घटकेचें राज्य व श्री. सवाई माधवरावांचें अज्ञानपणांतील राज्य म्हणजे सन १७७३ ते १७९५ पर्यंत या द्वेषी पण खुळ्या लोकांचे राज्य होतें. छत्रपति शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीपासून चां. का. प्रभूंच्यावर ग्रामण्याची झळ लागली ती पुढें न विझतां धुमसत होती. पेशवाईंत थोरले माधवराव पेशव्यांपर्यंत त्यांस भडकण्यास वाव मिळाला नाहीं. तो श्रीमंत नारायणराव पेशवे ह्यांच्या कारकीर्दीत या द्वेषी लोकांच्या हातीं सत्ता येतांच ती आग एकदम भडकली. सवाई माधवराव अर्भक व पुढें लहानच असल्यामुळें

पंचवीस वर्षे ही यादवी चालली होती असें कै. राजवाडे म्हणत होते तें कांहीं खोटें नव्हे.

इ.सन १६७३-७४ पासून वरील लोकांच्या मनांत कायस्थ प्रभूंच्या धार्मिक कृत्यांवर घाला घालावयाचा होता. ते संधि पहात होते. ती संधि नालायक नारायणराव पेशवे गादीवर विराजमान झाले तेव्हां मिळाली. पुढील पेशवे अज्ञान ह्या संधींत या लोकांचें फावलें व त्यांनीं आपली बरेच वर्षांची खुमखूम जिरवून घेतली. परंतु दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनीं यांस थारा दिला नाहीं, सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत पेणकर द्वेष्ट्यांनीं ह्याच ग्रामण्याची उचल खाल्ली व हा वाद पेशव्यांचे दरबारीं आला. दरबारच्या कांहीं मुत्सद्दी म्हणविणाऱ्या मंडळीनीं यांस प्रोत्साहन देऊन हा वाद चांगलाच रंगविला. इतकेंच नव्हे, तर ह्यावरील कतब्याच्या अगर का. प्र. च्या अपूर्व दस्ताऐवजाच्या शेंकडों प्रति करून गांवोंगांवीं, सरदार, मुत्सद्दी, इनामदार, जहागीरदार, संस्थानिक वगैरेंना त्या पाठविल्या. त्याची नोंद सवाई माधवराव पेशवे यांच्या रोजनिशींत दिलीच आहे. अशी एखादी प्रत इतिहास संशोधकांस मोठ्या प्रयासानें गळाठ्यांत सांपडली कीं, ते एक अपूर्व दस्ताऐवज सांपडला, म्हणून तो मोठ्या प्रेमानें व आदरानें आपल्या ग्रंथांत अगर मासिकांत आपल्या नांवाखालीं प्रसिद्ध करून आपलें नांव इतिहासचार्यांच्या यादींत दाखल करून घेतात.

त्रिंबक सूर्याजीस श्रीमंत रघुनाथरावानीं कसबे साकोरे प॥ माणिकपुंज हा गांव इनाम दिला होता. तो ह्यावेळीं जप्त करण्यांत आला. त्यासंबंधीं त्रिंबक सूर्याजीनें ही जप्ती उठवावी म्हणून तक्रार केली होती. त्यासंबंधीं त्यांस उत्तर आलें तें:—

श्री

आषाढ व. १२ श. १६९६
[ २७ जुलै १७७४ ]

यादी त्रिंबक सूर्याजी विज्ञापना ऐसिजे.

सु॥ खमस.

सेवकाचे गांव जप्त आहे ते मोकळें करावयाच्या सनदा खानदेश व पाल हवेली मामलेदार व जमिदारास सनदा—

१ कसबे साकोरे प॥ माणिकपुंज
१ मौजे त॥ पाल्हवे

——

२

दोन गांव दवलतीचा बंदोबस्त जाल्यानंतर तुम्हांकडे चाकरीत दिल्हे जातील.

करार तूर्त साकोरे मोकळीक चिटी देणें.

त॥ सी महाल त॥ अवचित गड येथील हवाला पुरातन गणेश सूर्याजीचें नांवे चालत आला हली रा॥ बाजी गोविंद याणी आपले भावाच्या नांवे करून घेतला आहे तो पेशजीप्रमाणें चालवणार धनी समर्थ आहेत.

सालीना मोइना

१५० मोईना तूप
२४ पोरगा
३६ दिवट्या, तेल वजन पक्कें ८८।•
दरमहा ८८३॥•

छ २५ जमादिलावल सु॥ खमस सबैन मोकळीक सनदा असत.

१ नारो कृष्ण तरवे सर-सुभेदार प॥ खानदेश.
१ जमींदार
१ मोकादम

———

३

याप्रमाणें ही यादी आहे.

त्रिंबक सूर्याजी ग्रामण्याच्या यादवींतून मुक्त झाल्यानंतर कांहीं वर्षे स्वस्थच बसून होता; कारण ह्या मंडळींत त्यास बारभाईनीं आपल्या पक्षास सामील करून घेतलें नव्हतें असें दिसतें. बारभाईचें ह्यावेळीं मोठें कारस्थान म्हणजे श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांस नेस्तनाबूत करण्याचा बांधलेला चंग हें होय. याच सुमारास, जुन्नर, भीमाशंकर त्रिंबकेश्वराच्या आसपास कोळी लोकांनीं बंड करून कित्येक पहाडी किल्ले आपल्या ताब्यांत घेतले आणि ते स्वतंत्रपणें वागूं लागले. असें सुमारें पांच सात वर्षे चाललें होतें. पण बारभाईकडून ह्याचा बंदोबस्त झाला नाहीं. तथापि त्रिंबक सूर्याजीनें सैन्य जमवून बंड-

खोरांपासून त्रिंबकचा किल्ला व आसपासचा मुलूख हिसकावून आपल्या ताब्यांत घेतला व शांतता राखिली. पण दंगेखोरांच्या हातून आपल्या सरदारानें हा प्रांत सोडविला म्हणून त्यांस शाबासकी न देतां श्रीमंत रघुनाथराव दादांचे पक्षाचा म्हणजे आपल्या शत्रूपक्षाचा आहे, असा शिक्का मोर्तबा त्याचें नांवावर बारभाईनीं मारून टाकला. "सातपुडयाच्या बाजूस दादांच्या उठावणीनें पांच सात वर्षें कोळयांनीं सारखे दंगे चालविले. गुलजारखानानें, खानदेशांत बंडावा केला. अशा अनेक बाबती यावेळीं बारभाईस कशा जाचक झाल्या, त्या सर्व तपशीलवार येथें देतां येत नाहींत. + + दादांचा एक प्रभू सरदार त्रिंबक सूर्याजी प्रांतांत धामधूम उडवीत त्रिंबक पावेतों आला." ( १७७५ म. रि. उ. १·५५ ) या संबधीं पुढील उतारा पहा:—( १७७५ नोव्हेंबर ) "जुन्नर भिमाशंकर व त्रिंबकेश्वर यांच्या आसपास धांट व बंधारी कोळी लोकांनीं कित्येक पहाडी किल्ले घेऊन फारच पुंडावा आरंभिला. त्रिंबक सूर्याजी प्रभु दादासाहेबांचा अनुयायी फौज जमवून सप्तश्रृंगीचा[1] डोंगर धरून बसला." (ऐ.ले.सं.५पा, २२६१)

त्रिंबक सूर्याजी श्रीमंत रघुनाथरावांच्या पक्षाचा म्हणजे शत्रुपक्षाचा अनुयायी होता, तर बारभाईकडून त्याची नेमणूक पुढील महत्वाच्या कामगिरीवर कशी झाली, हें एक गूढच नव्हे काय ? श्रीमंत रघुनाथराव बारभाईचे शत्रु होते. त्यांच्या सवाई सदाशिवराव भाऊ बारभाईस शत्रु निर्माण झाले होते. वाटल्यास त्यांना तोतये म्हणा. कोळयांच्या दंग्याच्या धामधुमींत यांचे खूळ महाराष्ट्रांत उद्भवलें. त्यांस बारभाईनीं पकडून प्रथम मिरजेच्या किल्ल्यांत कैद करून ठेविलें. तेथून काढून त्यांस रत्नागिरीच्या किल्ल्यांत ता. २४ नोव्हेंबर १७७५ ला नेऊन ठेविलें. पुढें १७७६ च्या

---

१ या सप्तश्रृंग गडावरून सरकारीरीत्या चौदा वर्षें मला जावें यावें लागे. दरवर्षी एकदां देवीस किल्ल्यावर जाऊन आम्हीं कलेक्टर कचेरींतील मंडळी अभिषेक करीत असूं. खालीं नांदुरीस साहेबांचा मुक्काम शिकारी निमित्तानें होई. त्यावेळीं सहाजिकच त्रिंबक सूर्याजीच्या व श्रीमंत दादासाहेबांच्या पराक्रमाचें कौतुक वाटे. किल्ल्यावरील हेमांडपंती देवळाची व खालील राष्ट्रकूटांच्या वेळच्या देवालयांच्या अवशेषांची पहाणी मीं करीत असे. कित्येक फोटोहि घेत असे.——य. रा. गुप्ते.

फेब्रुवारी १८ ला त्या किल्ल्यांचा अधिकारी रामचंद्र नाईक[1] यानें त्यांस मुक्त करून त्यांच्या नांवाची द्वाही फिरविली. त्याबरोबर तेथील हजारों लोक त्यास सामील झाले. थोडक्यांच दिवसांत त्यांनी तेथें बरीच फौज नोकरींत ठेविली. इतकेंच नव्हे तर कोंकण पट्टींतील विजयदुर्ग, देवगड, अंजनवेल, गोवळकोट वगैरे किल्ले आपल्या ताब्यांत घेतले. या खेरीज विशेष महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे पेशव्यांचा पश्चिम किनाऱ्यावरील दर्यासारंग धुळप, यानें आपल्या ताब्यांतील सर्व आरमार त्यांच्या स्वाधीन केलें. अशा प्रकारें कोंकण पट्टींत ते दिवसेंदिवस प्रबळ होत चालल्यामुळें बारभाईस त्यांची धास्ती वाटू लागली व त्यांस नेस्तनाबूत केल्यावांचून त्यांस गत्यंतर नव्हतें. आणि म्हणून बारभाईनीं त्यांजवर एका प्रभु सरदारास, गारदी व अरब यांची मोठी फलटण देऊन रवाना केलें. ते आपले सैन्यासह लढण्यास सिद्ध झालेच. उभयतां सैन्यांत घनचक्कर लढाई झाली. त्यांत बारभाईचें सैन्य बरेंच मारलें गेलें व जें शिल्लक राहिलें तें रणांगणांवरून पळून गेलें, तें प्रतापगडाच्या आश्रयास आलें. नंतर भाऊसाहेबांनीं अथवा तोतयांनीं सुवर्णदुर्ग किल्ला हस्तगत केला. सुमारें चार महिन्यांत ते बोरघाट चढून आले व राजमाचीचा किल्ला घेऊन त्यांनीं सिंहगडास शह दिला. याप्रमाणें त्यांस सारखा जय मिळत गेल्यामुळें ते शिरजोर होतील व पचनी पडलेली पेशवाईची सत्ता आपल्या हातून जाईल, तेव्हां त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे असें ठरवून, बारभाईनीं, शिंदे, पानसे, वगैरे सरदारांस त्यांजवर पाठविलें. पेशव्यांच्या सरदारांच्या सैन्यांच्या व त्यांच्या सैन्याच्या निरनिराळ्या ठिकाणीं गांठी पडल्या. पण राजमाचीच्या पायथ्याशीं महादजी शिंद्यानें त्यांच्या सैन्यांस गांठलें. उभयतांचा निकराचा सामना झाला. शिंद्यांचें सैन्य कसलेलें असून त्यांचे सर्व सैन्य नवीन भरतीचें असल्यामुळें फारच मारलें गेलें, तर कांहीं रणांगणातून टिकाव लागत नाहीं असें पाहून पळून गेलें. तेव्हां भाऊसाहेब अथवा तोतयेहि पळून गेले. त्यांचा पाठलाग शिंद्यांनी केला. तेव्हां कोंकणातून पळून ते बेलापुरास गेले. आणि गलबतांत बसून मुंबईत इंग्रजांच्या आश्रयांस गेले. त्यांस आपल्या ताब्यांत घेण्याकरितां बारभाईकडून इंग्रजांकडे सन १७७६ च्या नोव्हेंबरांत जे गृहस्थ गेले, त्यांत त्रिंबक सूर्याजी हा एक होता.

त्रिंबक सूर्याजी जितका शूर व धाडसी होता तितकाच तो मुत्सद्दीहि

---

१ परांजपे.—य. रा. गुप्ते.

होता. आणि म्हणूनच बारभाईकडून त्याची नेमणूक ह्या कामगिरीवर केली गेली. तो इंग्रजांकडे मुंबईस गेला. आणि आपल्या मुत्सद्देगिरीच्या बोलण्यांनीं इंग्रजांस समजाऊन सांगून भाऊंस अथवा तोतयांस आपल्या ताब्यांत घेऊन आला; इतकेंच नव्हे तर त्यांनीं कुलाब्याच्या रघोजीराव आंगऱ्याकडेहि बोलणीं करण्यास मनुष्य पाठविला. " वासुदेव बाबा त्रिंबक सूर्याजी व घोरपडे यांनीं मुंबईस जाऊन इंग्रजांस गैरवाका समजाऊन आंगरे ( रघोजी ) याजकडे वकील पाठविला. त्यामुळें आंगरे आंदेशांत पडले. " ( म. रि. उ. १–८४ ) तसेंच महादाजी शिंदे यानें नाना फडणीसास यासंबंधीं कुलाब्याहून पत्र सन १७७६ च्या नोव्हेंबर ८ ला लिहिलें तें:–

" राजश्री रघोजी आंगरे याजकडे तोतयास आणावयास बाळाराव गोविंद राणेखान पाटील ह्याजकडून पेशजी पत्रें आलीं तींच बजिन्नस आपणाकडे पाठविलीं व राजश्री सदाशिवराव दिनकर पाठविले, याजवरून सविस्तर कळलेंच असेल. वासुदेवबावा व त्रिंबक सूर्याजी व घोरपडे मुंबईस गेले. त्याणी इंग्रजांस गैरवाका समजाऊन आंगरे याजकडून वकील पाठविला. " ( इ. सं. ऐ. टि. ४९ ) या प्रमाणें बारभाईतर्फे तिघे इंग्रजांकडे जाऊन, तोतये अथवा सदाशिवराव भाऊ यांस आपल्या ताब्यांत घेऊन आले. त्यांचा निकाल पुढें काय लागला तो इतिहासांत नमूद आहेच.

श्रीमंत रघुनाथरावांनीं त्रिंबक सूर्याजींची कर्तबगारी जाणून त्यास पांचहजारांचा जहागिर गांव इनाम दिला होता हें मागें दिलेंच आहे. तसेंच त्याचा व श्रीमंत रघुनाथरावांचा पत्रव्यवहार होत असे. तरी तो बारभाईंचा द्वेष्टा नव्हता. हें मागील व पुढील त्याच्या वागणुकीवरून सिद्धच होतें. नाहीं तर तो ह्या वेळीं एखाद्या डोंगरी किल्ल्यांत विनाचौकशी अटकेंत पडला असता ! असो.

त्रिंबक सूर्याजीनें श्रीमंत रघुनाथरावांस पत्र पाठविलें होतें. त्याचें उत्तर सन १७७८ च्या एप्रिलच्या १२ ला आलें तें:–

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री त्रिंबक सूयाजी यांस--

स्ने ॥ रघुनाथ बाजीराव आसीर्वाद सु ॥ समान सबैन मया व अलफ तुम्हीं विनंति पत्र पाठविलें ते प्रविष्ट जालें हुजूर येण्याचा मजकूर लि ॥ तो विदित जाहला यैशास खासा स्वारी खाली उतरतांच बातमी राखोन हुजूर पोहचणें जाणिजे छ १३ र॥वल आज्ञाप्रमाण इंगरेजी अंमलांतून सरकार अमलात स्वारी येईल तेव्हां हुजूर येणें छ मजकूर.

लेखना
वधि

पुढें त्रिंबक सूर्याजी बेकार झाल्यामुळें कोठें तरी उद्योगधंदा करावा म्हणून त्यानें श्री. रघुनाथरावास पत्र पाठविलें असावें. पण तो त्यांकडे गेला नाहीं. तो सन १७८१ त पेशव्यांच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदोबस्ताच्या कामगिरीवर होता. यावेळीं इंग्रजांचीं गलबतें पेशव्यांच्या बंदरांतून धान्य वगैरे माल बिगर परवाना नेत असत, जकात, वगैरे भरीत नसत. तेव्हां त्रिंबक सूर्याजीस अशीं जी गलबतें येतील तीं अडकावून ठेवावयाचीं व त्यावरील खलाशांस कैद करून ठेवावयाचें आणि इंग्रजांच्या मुलखांत धामधूम करावयाची; पकडलेले खलाशी खंडणी देतील ती घेऊन त्यास सोडावयाचे असे अधिकार देऊन ठेविले होते. या कामगिरीकरितां त्यांस चौघे मदतीस दिले होते. ते रायाजी नाईक बोरकर, गणोजी नाईक भाटकर, विठोबा नाईक पातलेकर व गोविंद राम. यांखेरीज तेथील बंदराचे अधिकाऱ्यांसहि यांस मदत करण्यासाठीं पत्रें पाठविलीं होतीं. " ( इसने समानीन मया व अलफ, जिल्काद

२६[1] ) इंग्रजांचे तारूं तरांडे धरावयास व त्यांच्या मुलखांत धामधूम करावयास त्रिंबक सूर्याजी यास आज्ञा केली आहे तरी त्याचे तर्फे जे रायाजी नाईक बोरकर व गणोजी नाईक भाटकर व विठोजी नाईक पातलेकर व गोविंद राम यांस रवाना केले असत. इंग्रजांचे तारूंतरांडे धरतील व दाणा गल्ला मुंबईस जाईल, त्याचा बंदोबस्त करितील. त्यांस तुम्हीं मुजाहिमा न होणें व इंग्रज मुलखांतील कमाविसाच्या असाम्या दस्त करून आणितील त्यांस तुम्हीं आटकेंत ठेवणें. त्यास आडशेरी वगैरे खर्च पडेल तो मशारनिल्हे देत जातील अटकेंतील कुळांची खंडणी हे करून ज्यास सोडवावयास सांगतील त्या प्रमाणें सोडीत जाणें म्हणोन चिटणीसी पत्र

"१ तालुके देवगड निसबत गंगाधर गोविंद

१ तालुके देवगड निसबत चिमणाजी रामचंद्र यांचे नांवे पत्र इंग्रजकडील असाम्या आणतील त्यास किले भगवंतगड येथें ठेवणें, हे अचरे बंदरी राहतील त्यांस राहूं देणें म्हणून पत्र " ( स. मा. रो. भाग ३ पा. ५७ )

त्रिंबक सूर्याजी पेशव्यांच्या हुकुमावरून पश्चिम किनाऱ्यावरील बंदराच्या बंदोबस्ताकरितां गेला. तो परस्थांचीं गलबतें बिगर परवाना माल घेऊन जात त्यांची झडती घेऊं लागला. त्याप्रमाणें गोवेकरांचें गलबत माल भरून मुंबईस जात होतें, तें पकडून अटक करून त्यानें ठेविलें. त्याची रीतसर चौकशी करण्यांकरितां पेशव्यांकडे, त्यानें पत्र लिहिलें. त्याप्रमाणें अलिबाग येथील येस सावंत यांस पेशव्यांकडून हुजूर बोलावणें आलें तें पत्रः—

---

१ ता. १३ नोव्हेंबर १७८१ इ.—य. रा. गुप्ते.

श्री

राजा शाहू नरपति
हर्ष निधान माधवराव
नारायण मुख्य
प्रधान

आज्ञा पत्र राजश्री पंत प्रधान ता॥ येस सावंत कसबे अलिबाग सु ॥ सबा समानीन मया व अलफ. राजश्री त्रिंबक सूर्याजी याणीं हुजूर विदित केले कीं सन इसने समानांत सरकारांतून जलमार्गानीं बंदी आम्हांस सांगितली होती त्यांस आम्हांकडील लोकांनीं चौकसी हुजूर पडली आहे गलबत धरले ते माघारे देणें म्हणून सरकारांतून आज्ञा जाली त्यास आम्हांकडील येसाजी सावंत वगैरे याणीं रुजवात जालियावर घरीं जातेसमयीं गोवेकराचें गलबत त्याचा दाखला त्याणीं आम्हांकडे दिला नाहीं. याजकरितां सावंत म॥स आणून चौकसी केली पाहिजे म्हणोन त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असें व सरकारचे प्यादे असामी दोन पाठविले आहेत. तरी तुम्हीं प्याद्या बरोबर हुजूर येणें. जाणिजे. छ २६[१] जिल्हेज आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा

येथ पर्यंत उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक माहितीवरून हें चरित्र लिहिलें आहे. त्यावरून पाहतां त्रिंबक सूर्याजी प्रभु हा सरदार इ. सन १७५० पासून

१ ता. १९ ऑक्टोबर १७८६ इ.—य. रा. गुप्ते.

१७८६ पर्यंत, आपल्या धन्यांच्या म्हणजे पेशव्यांच्या आज्ञेवरून ज्या ज्या लढायावर गेला, त्या त्या प्रसंगीं यशस्वी होऊनच आला हें वर दिलेल्या माहितीवरून उघड होतें. ह्या खेरीज आणखीहि कित्येक स्वाऱ्यावर तो गेला असावा. ती सर्व माहिती उपलब्ध झाली नाहीं. पण ह्यावरून पाहतां सरदार त्रिंबक सूर्याजीनें आपल्या पुरातन वैभवशाली घराण्याचें[1] वैभव व कीर्ति कायम ठेविली हेंच याचें वैशिष्टय होय !

या सरदाराचा मृत्यु केव्हां व कसा झाला याची माहिती उपलब्ध झालेली नाहीं. पण त्याचा वडील मुलगा ( बापूजी ) यानें शेवटच्या बाजीराव पेशव्यांकडे परळीं गांवच्या इनामासंबंधीं तक्रार केल्याचें एक पत्र पाहण्यांत आलें. त्यावरून पाहतां सन १७९८ त हा सरदार हयात नसावा. असो.

आजपर्यंत या सरदार त्रिंबक सूर्याजीनें, आपलें शौर्य, धाडस व पराक्रम गाजविला. त्याची अंधारांत पडलेली अल्प माहिती मिळवून हें अल्पचरित्र महाराष्ट्रीय वाचकांस सादर केलें आहे.

---

१ कै. नामदार म. भा. चौबळ याच चौलच्या चौबळांपैकीं. चां. का. प्रभु घराण्यांतील शिवशाहींत व पेशवाईंत वावरणाऱ्या कितीतरी पुरुषांची माहिती अप्रसिद्ध आहे. ती दिल्यास इतिहासावर पुष्कळच नवा प्रकाश पडणार आहे. परंतु ही जात मनस्वी बेपर्वा आहे. ऐतिहासिक कागद कुजवून घालवीत आहे. काय तर आम्हांस वेळ नाहीं ! ब्राह्मण मंडळी चां. का. प्रभूपेक्षां मोठमोठ्या जागांवर अधिष्ठित आहेत. त्यांस वेळ मिळतो ! व ते घराण्यांचे इतिहास लिहितात. पण आम्हीं लोक कामांत चूर!! यास म्हणावें तरी काय ? काय ही अनास्था ! !––य. रा. गुप्ते.

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६६०६ ६६२८
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २८०९
विभाग
क्रमांक ६८५
नों. दि. १०/१०/५४

## वंश वृक्ष

कृष्णाजी प्रभु चौबळ

|

नारायण प्रभु

|

गोविंद प्रभु

|

नार प्रभु

|

कृष्ण प्रभु


|

गोविंद प्रभु

|

मारो उर्फ नारायण

| | | |
|---|---|---|
| मल्हार प्रभु | सूर्याजी | विठ्ठल |




वंशवृक्ष फार मोठा आहे. फक्त महत्वापुरताच उतारा येथें दिला आहे.

# आधारास घेतलेल्या ग्रंथांची यादी–


१ चां. का. प्र. इ, सा. मासिक अंक १२ वा

२ देऊसकर कृत– चौल ( चंपावती ) शहराचा इतिहास.

३ बा. बा. पेशवे रोजनिशी.

४ पेशवे द. २०, २३, ३७, व ३९

५ राजवाडे खं. १२, १३ व १४

६ म. रि. भा. ४

७ म. रि. उ. भा. १

८ ऐ. ले. सं. ४ व ५

९ इ. सं. मा. ऐ. टि.

१० स. मा. पेशवे रोजनिशी भा. ३

११ रा. रा. इनामदार यांजकडील सनदापत्रें.

१२ श्री. जोगळेकर, इनामदार मु. श्री त्रिंबकेश्वर यांजकडील माहिती.



REFBK-0006628

अनुक्रम ९८०९८
विभाग
क्रमांक
नों. दि.